रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २७१
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, १९ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## पंतप्रधान नरेंद्र मोदींची आज वर्ध्यात जाहीर सभा



**वर्धा** : पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि.१९) वर्धा जिल्ह्यात येत आहेत. जिल्ह्यातील तळेगाव येथे त्यांची सायंकाळी ४ वाजता जाहीर सभा होणार आहे. या सभेसाठी ३५ एकरांमध्ये मंडपाची उभारणी करण्यात आली असून सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यापूर्वी २०१४ आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान पंतप्रधान मोदींनी वर्धा शहरात सभा घेतली होती. आता तिसऱ्यांदा ते तळेगाव येथे येत आहे. सभेसाठी तळेगाव-आर्वी मार्गावरील साखर कारखाना परिसरातील चेतना ग्राउंडवर भव्य मंडप उभारण्यात आला आहे. शासकीय यंत्रणेसह पोलिसांचा मोठा ताफा तळेगाव येथे दाखल झाला आहे. तळेगाव परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींचा शुक्रवारी नागपुरात मुक्काम असेल, तर २० एप्रिलला ते नागपुरातून परभणीला प्रचारसभेसाठी जाणार आहेत.

### खासदार सुनील तटकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

# अलिबागमध्ये महायुतीचे शक्तीप्रदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनी गुरुवारी (दि. १८) आपला अर्ज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांच्याकडे सादर केला. यानिमित्ताने महायुतीने अलिबागमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन करीत खासदार तटकरे यांच्या विजयाचा निर्धार केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी अलिबागजवळील चिंतामणराव केळकर विद्यालयासमोरील मैदानात महायुतीची प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, शिवसेनेचे प्रतोद भरत गोगावले, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेश बालदी, आमदार योगेश कदम, आमदार अनिकेत तटकरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, माजी आमदार विनय नातू, शेखर निकम, सूर्यकांत दळवी, मनसेचे नेते नितीन सरदेसाई, शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, आरपीआयचे सीताराम कांबळे आदींसह प्रमुख पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. त्याचप्रमाणे सभेला पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

या वेळी मंत्री उदय सामंत, रवींद्र चव्हाण, हसन मुश्रीफ यांनी देशात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, तर राज्यात एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार काम करीत आहे. विकास असाच पुढे सुरू राहणार आहे. सुनील तटकरे यांना पुन्हा खासदार करण्यासाठी कार्यकर्त्यांनी दिवसरात्र मेहनत घ्यावी, असे आवाहन केले.

आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, आमदार भरत गोगावले, माजी आमदार विनय नातू, धैर्यशील पाटील, आरपीआयचे सीताराम कांबळे यांचीही समयोचित भाषणे झाली. उपस्थितांचे आभार भाजप जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते यांनी मानले. यानंतर खासदार सुनील तटकरे यांनी मंत्री रवींद्र चव्हाण, शिवसेनेचे प्रतोद भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्यासमवेत उमेदवारी अर्ज दाखल केला.

### गीतेंचे काम दाखवा आणि हजार रुपये मिळवा -खासदार सुनील तटकरे

महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे म्हणाले की, ही निवडणूक आपल्या देशाचे जागतिक पातळीवर स्थान बळकट करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने विविध योजना, उपक्रम, निर्णय घेतले. कोकणच्या विकासातील महत्त्वाचा अटल सेतू पूर्ण झाला आहे. गीतेंचे काम दाखवा आणि हजार रुपये मिळवा असे म्हणण्याची वेळ का आली याचे आत्मपरीक्षण त्यांनी करावे.

### सुनील तटकरेंचा विजय निश्चित -मंत्री हसन मुश्रीफ

आजची गर्दी पाहिल्यानंतर सुनील तटकरे यांचा विजय निश्चित आहे हे सांगण्यासाठी कुण्या ज्योतिषाची गरज नाही, असा विश्वास मंत्री हसन मुश्रीफ यांनी या वेळी व्यक्त केला. अलिबाग येथील मेडिकल कॉलेजबरोबरच म्हसळा येथील युनानी कॉलेज, ग्रामीण हॉस्पिटलची कामे लवकरच मार्गी लागतील, असेही त्यांनी सभेत सांगितले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करूया -मंत्री उदय सामंत

एनडीएच्या ४०० पार खासदारांमध्ये महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे हेही असले पाहिजेत यासाठी रत्नागिरी भागातून त्यांना चांगले मताधिक्य दिले जाईल, असा शब्द पालकमंत्री उदय सामंत यांनी दिला. रामराज्य आणि सुराज्य आणायचे असेल, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करायला हवेत, असेही ते म्हणाले.

### ही निवडणूक पुढच्या पिढीचे भविष्य ठरवणारी -मंत्री रवींद्र चव्हाण

सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, ही निवडणूक देशासाठी आणि देशातील पुढच्या पिढीचे भविष्य ठरवणारी आहे. त्यामुळे महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी बूथवर काम करणे गरजे आहे. या मतदारसंघात घड्याळासमोरचे बटण दाबल्यावर हे मत पंतप्रधान नरेंद्र मोदींना मिळणार आहे. ही लढाई लढायची आहे आणि जिंकायची आहे.

## निवडक

### ईडीकडून राज कुंद्राची ९८ कोटींची संपत्ती जप्त



**मुंबई** : बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा याच्या विरोधात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मनी लॉण्डरिंगप्रकरणी कारवाई केली आहे. ईडीने गुरुवारी (दि. १८) राज कुंद्राची ९७ कोटींची मालमत्ता जप्त केली. मीडिया रिपोर्ट्‌सनुसार, ईडीने बिटकॉइन पॉन्जी स्कॅम अंतर्गत ज्या मालमत्ता जप्त केल्या, त्यात शिल्पा शेट्टीचा मुंबईच्या जुहू येथे असलेला बंगलादेखील समाविष्ट आहे.

### डॉ. दाभोलकर खून खटल्याचा येत्या १० मे रोजी निकाल

**पुणे** : अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून खटल्याचा निकाल येत्या १० मे रोजी लागणार आहे. त्यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेने अवघे राज्य हादरले. दाभोलकरांच्या खुनाचा तपास पूर्ण होऊन सप्टेंबर २०२१मध्ये पुण्यातील विशेष न्यायालयाने पाच आरोपींविरोधात आरोप निश्चित केले आणि खटल्यास सुरुवात झाली. या खटल्याची सुनावणी आता पूर्ण झाली आहे.

## पंतप्रधान मोदींना देशात पर्याय नाही

### मुख्यमंत्री शिंदेंचे प्रतिपादन; सुनेत्रा पवार यांचा अर्ज दाखल



**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म राष्ट्रहितासाठी झाला आहे. त्यांची गॅरेंटी बाजारात चालते. याउलट राहुल गांधी हे ५४ वर्षांचे झाले, पण त्यांना काँग्रेस अद्याप नीट लाँच करू शकली नाही. त्यांना आतापर्यंत चार ते पाच वेळा लॉन्च केले गेले, पण ते चालू शकले नाही. देशाने चांद्रयान यशस्वी लाँच केले, पण राहुल गांधी देशात चालू शकलेले नाही. त्यामुळे पंतप्रधान मोदींना देशात दुसरा पर्याय नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि.१८) केले.

बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आपला अर्ज पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केला. अर्ज दाखल करतेवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री व रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल उपस्थित होते. या वेळी आयोजित सभेत मुख्यमंत्री शिंदे यांनी बारामतीमध्ये आता भाकरी फिरवायची वेळ आली आहे, असे म्हटले.

या सभेस मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, खासदार मेधा कुलकर्णी, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री विजयबापू शिवतारे, पुण्याचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हेही उपस्थित होते तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आज आपण बारामतीत परिवर्तनाची आस आणि घड्याळाची लाट इथेही पाहत आहोत. खऱ्या अर्थाने बारामतीकरांनी परिवर्तन करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे बारामतीत परिवर्तन होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनेत्रा पवार यांचा उल्लेख बारामतीकरांच्या मनातील सूनबाई असा केला. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवारांसह उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला, तर सुनेत्रा पवार यांनी हात जोडून त्यांचे आभार मानले. अन्य नेत्यांनीही आपल्या भाषणात सुनेत्रा पवार यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

## रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून केंद्रीय मंत्री नारायण राणेंना उमेदवारी



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

महायुतीतील रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभेच्या जागेवरून शिवसेनेने माघार घेत ही जागा भाजपला दिली आहे. या मतदारसंघातून भाजपने केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उमेदवारी दिली आहे.

महायुतीत रत्नागिरी-सिंधुदुर्गची जागा भाजपला सुटल्यानंतर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, त्यांचे बंधू किरण सामंत आणि रत्नागिरीतील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेतली. या वेळी मंत्री सामंत म्हणाले की, आम्ही काही काळ थांबण्याचा निर्णय घेतला आहे. असे असले तरी पूर्ण ताकदीने नारायण राणेंबरोबर उभे राहू. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेला शब्द खाली पडणार नाही याची काळजी घेतली जाईल, तर किरण सामंत यांचा महायुतीत सन्मान होईल, असे अमित शाह, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला आश्वस्त केले आहे.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उमेदवारी मिळाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर मंत्री राणे हे शुक्रवारी (दि. १९) रत्नागिरी येथे ११ वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

### विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी -मंत्री राणे

रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी यावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. उमेदवारी मिळणार हे अगोदरच माहिती होते. त्यामुळे प्रचाराला सुरुवात केलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली विकासाचा मुद्दा घेऊन आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. ४०० पार करायचे आहे. या वेळी मंत्री राणे यांनी उमेदवारी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सामंत बंधूंचे आभार मानले.



पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी बुधवारी महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २०मध्ये प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी तक्का येथील जरीमरी मंदिरात भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी श्रीफळ वाढवून प्रचाराला सुरुवात केली. दरम्यान, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेथे भेट देत कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. या वेळी खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयी हॅट्‌ट्रिकसाठी घोषणा देण्यात आल्या. (वृत्त पान ३ वर..)

### लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी आज मतदान प्रक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया शुक्रवारी (दि.१९) होणार आहे. यासाठी प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

देशात सात टप्प्यांमध्ये लोकसभा निवडणूक होणार आहे. यासाठी शुक्रवारी पहिल्या टप्प्यात देशभरातील १०२ मतदारसंघांत मतदान होईल. यात महाराष्ट्रासह २१ राज्यांमधील १०२ जागांवर १६२५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या मतदारसंघांत मतदान होणार आहे.

## संजय राऊतांची जीभ घसरली

### खासदार नवनीत राणांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य

**अमरावती : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सध्या प्रचाराचा धुराळा उडत आहे. यादरम्यान ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी अमरावती येथे काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडेंसाठी घेण्यात आलेल्या सभेत स्थानिक खासदार व भाजप उमेदवार नवनीत राणा यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्ये केली. त्यामुळे राऊत यांच्यावर टीका होत आहे.



बळवंत वानखेडे यांच्याविरोधात नाचीची नाही, तर देशाची लढाई आहे. आमची लढाई बबलीसोबत नाही, असे खासदार संजय राऊत म्हणाले तसेच विकासाचे पोरगं तुम्हाला झाले नाही, म्हणून तुम्ही दुसऱ्याचे नवरे करता. ती बाई खुणावेल. ती पडद्यावरची नटी आहे. तुम्हाला प्रेमाने बोलावेल, पण तुम्ही मोहाला बळी पडू नका. आपण सावध राहिले पाहिजे. डोळा मारला की जायचे नाही. रात्र वैऱ्याची आहे. रात्रीस खेळ चाले, अशीही आक्षेपार्ह विधाने राऊत यांनी भर सभेत केली. त्यामुळे हीच का उद्धव ठाकरे गटाची संस्कृती, असा सवाल उपस्थित झाला आहे.

# नाचता येईना अंगण वाकडे!

## केंद्रीय मंत्री अमित शाह यांचा राहुल आणि प्रियंका गांधींवर हल्लाबोल

**गांधीनगर : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी (दि.१८) गांधीनगर लोकसभा मतदारसंघात रोड शो केला. या वेळी बोलताना अमित शाह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यावर हल्लाबोल केला.



प्रियंका गांधी यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना केंद्रीय मंत्री अमित शाह म्हणाले की, जेव्हा तुम्ही काहीही करू शकत नसाल, तेव्हा तुम्ही ईव्हीएमला दोष देता. तेलंगणा आणि हिमाचलमध्ये काँग्रेसने सरकार स्थापन केले तेव्हा ईव्हीएम ठीक होते. आता हरले तर नाचता येईना अंगण वाकडे! राहुल गांधी यांच्या आरोपांना उत्तर देताना ना. शाह यांनी, जेव्हा काँग्रेसच त्यांना गांभीर्याने घेत नाही, मग तुम्ही त्यांना का घेत आहात? संपूर्ण देशात कोणतेही आव्हान नाही. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेच्या ४०० जागा पार करतील. ते पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गांधीनगरमधून दुसऱ्यांदा निवडणूक लढवणारे ना. अमित शाह यांनी गांधीनगरमधूनच निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. भाजपने त्यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याचा निर्धार केला आहे.

मंत्री अमित शाह देशाच्या इतर भागात प्रचारात व्यस्त असताना दुसरीकडे त्यांच्या पत्नी गांधीनगरमध्ये प्रचारात व्यस्त होत्या. अलिकडच्या काही दिवसांत शाह यांच्या पत्नी सोनल शाह यांनी गांधीनगर लोकसभा मतदारसंघात घरोघरी जाऊन प्रचार केला.

याशिवाय भाजपच्या कामगिरीचीही माहिती देण्यात आली. या वेळी त्यांच्यासोबत पक्षाचे अनेक पदाधिकारीही उपस्थित होते.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उदयनराजे भोसले यांचा अर्ज दाखल



**सातारा : प्रतिनिधी**

सातारा लोकसभेसाठी महायुतीकडून भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी गुरुवारी (दि.१८) उमेदवारी अर्ज दाखल केला. जंगी शक्तीप्रदर्शन करीत त्यांनी महात्मा गांधी मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी भव्य रॅली झाली. रॅली पोवई नाका येथे आल्यानंतर दाखल झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.

यानंतर खासदार उदयनराजेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मंत्री शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. या वेळी आमदार शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार गोरे, मकरंद पाटील, महेश शिंदे, धैर्यशील कदम, अशोक गायकवाड उपस्थित होते.

महायुतीच्या माध्यमातून खासदार उदयनराजे भोसले यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी साताऱ्यात जंगी शक्तिप्रदर्शन करीत महारॅली काढली. जलमंदिर पॅलेस या त्यांच्या निवासस्थानापासून बैलगाडीतून उदयनराजे भोसले, शिवेंद्रराजे भोसले, अतुल भोसले हे गांधी मैदानावर रॅलीतून आले. तेथून स्वतंत्र सजवलेल्या दोन रथांच्या माध्यमातून रॅली मार्गस्थ झाली. एका रथावर खासदार उदयनराजे भोसलेंसह मान्यवर सहभागी झाले होते, तर दुसऱ्या रथात महायुतीतील घटक पक्षांच्या महिला पदाधिकाऱ्यांसमवेत दमयंतीराजे भोसले याही सहभागी झाल्या होत्या.

# उरणमध्ये मतदान करूया पथनाट्याचे सादरीकरण

**उरण : वार्ताहर**

कोमसापच्या मधुबन कट्ट्यावर आयोजित कार्यक्रमात बुधवारी (दि.१७) किशोर पाटील लिखित, दिग्दर्शित मतदान करू या पथनाट्याचे शेवा केंद्राच्या शिक्षकांनी सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक अशोक म्हात्रे होते.

या वेळी चंद्रकांत मुकादम, प्रकाश पाटील, देवदत्त सूर्यवंशी, एन.एम. पाटील, नारायण भोईर, मिरा ब्रीद यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी नृत्यदिग्दर्शक अमृत म्हात्रे, जलतरणपटू सारा पाटील, जयदास पाटील यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कविसंमेलनात संजय होळकर, अनुप शिवकर, मच्छिंद्र म्हात्रे, भरत पाटील, अशोक म्हात्रे यांनी कविता सादर केल्या.



# महाड एमआयडीसीतील स्टेक कंपनीत आग

## जीवितहानी नाही; लाखोंचे नुकसान

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्र परिसरातील काळीजकोंड गावच्या हद्दीत असलेल्या अतिरिक्त क्षेत्रातील के-२/१/२ अ‍ॅग्रो केमिकल उत्पादन करणाऱ्या स्टेक लाईफ सायन्स या कंपनीत बुधवारी (दि.१७) मध्यरात्री १ वा. च्या सुमारास भीषण आग लागली. जीवितहानी झाली नसली, तरी या आगीमध्ये कंपनीचे लाखोंचे नुकसान झाले आहे.



महाड औद्योगिक क्षेत्रातील स्टेक लाईफ सायन्स या कंपनीत बुधवारी मध्यरात्री भीषण आग लागली. आगीमुळे कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन कामगारांनी कंपनीबाहेर पळ काढला. त्या वेळी कंपनीत २५ कामगार काम करीत होते. आगीचा भडका उडून छोटे-मोठे स्फोट होऊ लागले. या स्फोटांमुळे परिसर हादरून गेला. वेळीच कामगार बाहेर पडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी २० लाख किमतीचे कंपनीचे डीडीए प्लांटचे स्क्रबर एरियामधील टँक, ब्लोअर केमिकल सप्लाय करण्याची पाईपलाईन तसेच इतर साहित्य जाळून खाक झाले. ही आग एचसीएल टँकचे तापमान वाढल्याने स्क्रबरने पेट घेतल्याने आग लागली असल्याचे कंपनी प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महाड एमआयडीसी, लक्ष्मी ऑरगॅनिक, प्रिव्ही ऑरगॅनिक आणि महाड नगर परिषद अग्निशमन यंत्रणा दाखल झाल्या होत्या. रासायनिक आग असल्यामुळे पाण्याव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात फोम प्रणालीचा वापर अग्निशमन यंत्रणेला करावा लागला. अथक प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आणि संभाव्य धोका टळला. या वेळी घटनास्थळी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जीवन माने व अन्य पोलीस कर्मचारी उपस्थित होते. या घटनेची नोंद महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात रणजीत प्रभाकर सावंत (वय ४६, रा. चांडवे खुर्द) यांच्या फिर्यादीनुसार करण्यात आली आहे.

# हॉटेलमध्ये हुक्कासेवन; सहा जणांवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील डेरवली येथील निसर्ग हॉटेलच्या पहिल्या माळ्यावर नागरिकांना हुक्क्यामध्ये तंबाखूयुक्त घटक असलेल्या सुगंधी पदार्थांचे सेवन करण्यासाठी दिल्याप्रकरणी सहा जणांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

निसर्ग हॉटेलच्या पहिल्या माळ्यावर हुक्का पिण्यासाठी देत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकला असता, पहिल्या माळ्यावर काही व्यक्तींना हुक्क्यामध्ये निकोटीन आणि तंबाखूयुक्त घटक असलेल्या सुगंधी पदार्थांचे सेवन करण्यासाठी देत असल्याचे मिळून आले. त्यामुळे तेथील सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलिसांनी या ठिकाणाहून काचेचे हुक्का पॉट, विविध डबे असे साहित्य जप्त केला आहे.

# जितेंद्र सोनवणे बनला पोलीस अधिकारी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले दि. गोपाळ वसंत सैंदाणे यांना पोलीस अधिकारी व्हायचे होते. त्यानुसार त्यांनी अभ्यासही सुरू केला होता. विशेष म्हणजे सहायक आयुक्तपदाची परीक्षाही दिली होती, मात्र त्यांचे हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. कर्तव्य बजावत असताना भंगारमाफियांच्या हल्ल्यात त्यांना वीरमरण आल्याने त्यांचे स्वप्न अधुरे राहिले. मामाचे अपूर्ण राहिलेले स्वप्न त्यांच्या जितेंद्र पंढरीनाथ सोनवणे या भाचाने पूर्ण केले आहे.



अथक परिश्रम घेऊन पोलीस उपनिरीक्षकपदाची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण होऊन त्याने आपल्या दि. मामाला श्रद्धांजली वाहिली आहे. शहीद गोपाळ सैंदाणे हे नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत होते. २००७मध्ये ऐरोलीतील पॉवर हाऊसमध्ये काही भंगारमाफियांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यात त्यांना वीरमरण आले होते. दि. सैंदाणे यांना पोलीस अधिकारी व्हायचे होते. त्यासाठी त्यांनी तयारीसुद्धा केली होती, मात्र अकाली निधनामुळे त्यांचे हे स्वप्न अपूर्ण राहिले.

पोलीस अधिकारी होण्याचे आपल्या मामाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जितेंद्र सोनवणे याने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. अभियांत्रिकी पदवी घेतल्यानंतर त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात दररोज आठ तास अभ्यास करून बी.ई.चे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एमपीएससीमार्फत होणारी परीक्षा देण्यासाठी तयारी केली. त्यानुसार पनवेल येथील आंबेडकर भवनमध्ये दररोज आठ ते दहा तास अभ्यास करून २०२२मध्ये त्याने पोलीस उपनिरीक्षकपदाची परीक्षा दिली. या परीक्षेचा गेल्या बुधवारी निकाल जाहीर झाला असून, जितेंद्र सोनावणे हा एसटी संवर्गातून महाराष्ट्रात पहिला आला आहे. अभियांत्रिकी विभागाची पदवी असतानाही केवळ दिवंगत मामाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो पोलीस अधिकारी झाल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. राष्ट्रीय खान्देश महासंघाचे अध्यक्ष व बांधकाम व्यावसायिक प्रकाश बाविस्कर यांनी जितेंद्र याच्या घरी जाऊन या यशाबद्दल त्याचे अभिनंदन करत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# स्व. बहिणाबाई दुधे यांच्या स्मरणार्थ दुर्गामाता वर्धापन दिन सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

स्व. बहिणाबाई उकर्डाजी दुधे यांच्या स्मरणार्थ २४वा दुर्गामाता वर्धापन दिन सोहळा रविवारी (दि. २१) दुर्गामाता मंदिर मातोश्री संकुल दांड रसायनी रोड, रीस येथे आयोजित करण्यात आला आहे.

यानिमित्ताने अभिषेक त्यानंतर ओंकार प्रासादिक भजन मंडळ आसरोटी यांचे भजन, सुप्रसिद्ध गायक तरुण दल अँड पार्टी माता की चौकी, सायंकाळी आरती, स्वर संगीत भजन मंडळ पोदी (कर्जत) व सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच त्यानिमित्ताने स्नेहकुंज आधारगृह, नेरे व साई आश्रय वृद्धाश्रम, पनवेल येथे अन्नधान्य वाटप करण्यात येणार आहे. यासाठी सुनील मुकादम, रमेश मराठे, गणेश मुकादम, प्रभाकर महाडिक, पंढरीनाथ भोईर, सचिन रेपाले, मिनीश बावीस्कर, राधेश्याम पांडे, नंदू म्हात्रे व दुधे ब्रदर्स यांचे सहकार्य लाभणार आहे. अधिक माहितीसाठी निमंत्रक तुकाराम दुधे (९८१९६७६०७०/९९२०१०८०४०/७७०९३६८९९२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंतप्रधान मोदींनी युती टिकवण्याचे प्रयत्न केले

## शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचे पत्रकार परिषदेत प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपने शिवसेनेबरोबरची युती कायम ठेवण्याचे प्रयत्न केले, मात्र उद्धव ठाकरे फसल्यामुळे पंतप्रधान मोदी आणि भाजपवर ते खोटे-नाटे आरोप करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे प्रतिपादन शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी गुरुवारी (दि.१८) केले.



महायुतीतर्फे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ना. केसरकर बोलत होते. राष्ट्रवादीचे नेते आणि मदत, पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, महायुतीचे समन्वयक आमदार प्रसाद लाड, रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी या वेळी उपस्थित होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर निष्ठा असलेल्या शिवसैनिकांनी भूलथापांना बळी पडू नये, असेही केसरकर यांनी नमूद केले.

ना. केसरकर म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपविरोधात अनेक बेताल आरोप केले आहेत. बाळासाहेबांच्या विचारांवर निष्ठा असणाऱ्या शिवसैनिकांनी वस्तूस्थिती जाणून घेणे आवश्यक आहे.

२०१७मध्ये भाजप आणि राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. त्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवसेनेबरोबर असलेली युती कायम राहिली पाहिजे, अशी भूमिका ठामपणे मांडली होती. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेते या घडामोडींचे साक्षीदार आहेत, असे ना. केसरकर यांनी सांगितले.

२०१९मध्येही पवारांची भाजपबरोबर जाण्याची इच्छा होती, मात्र वाटाघाटी फिसकटल्याने त्यांनी उद्धव ठाकरे आणि काँग्रेसला साथीला घेत सरकार बनवले. शिवसेना संपल्याखेरीज राष्ट्रवादी वाढणार नाही, असा त्यांचा समज असल्याने त्यांनी नेहमीच शिवसेनेचे पाय ओढण्याचे राजकारण केले. आता त्यांनी राजकीय स्वार्थासाठी भाजपविरोधात अपप्रचार सुरू केला आहे. त्यामुळे दर दोन दिवसांनी पत्रकार परिषद घेऊन मविआ नेत्यांची पोलखोल केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# बेवारस वाहनांच्या मालकी हक्काबाबत पोलिसांचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे पोलीस ठाणे यांच्या नेरूळ व एनआरआय पोलीस ठाण्याच्या आवारातील बेवारस पडून असलेल्या दुचाकी, स्कूटर, ऑटो रिक्षा, चारचाकी वाहनांच्या मालकी हक्काबाबत कोपरखैरणे पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा, अशी आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी केले आहे.

कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या नेरूळ व एनआरआय हद्दीत २० दुचाकी वाहने, एक चारचाकी वाहन, दोन ऑटो रिक्षा अशी एकूण २३ बेवारस वाहने सानपाडा पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आली आहेत. वर्षानुवर्षे या वाहनांचे मूळ मालक वाहने घेऊन जाण्यास आले नसल्याने मूळ मालकांनी सात दिवसांच्या आत आपली वाहने कागदपत्रे दाखवून घेऊन जावी, असे आवाहन कोपरखैरणे पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी केले आहे.

# पोलीस शिपाई भरतीसाठी २४ हजार अर्ज

**नाशिक : प्रतिनिधी**

डिसेंबर २०२३मध्ये राज्य शासनाने १७ हजार पोलीस शिपाई पदांसाठीच्या भरतीची घोषणा केली. त्यानुसार अर्ज मागविण्यात आले असता नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाकडे १५ हजार, तर नाशिक ग्रामीणकडे नऊ हजार अशा एकूण २४ हजार उमेदवारांनी अर्ज केले आहेत. आचारसंहितेमुळे भरतीची प्रक्रिया थांबविण्यात आली असली, तरी जूनअखेर भरतीची पुढील प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.



राज्य शासनाने राज्यभरात १७ हजार ४७१ जागांसाठी पोलीस शिपाई भरतीची घोषणा केली. त्याप्रमाणे मार्चमध्ये भरतीसाठी उमेदवारी अर्ज प्रक्रियेला प्रारंभही करण्यात आली. ३० मार्चपर्यंत उमेदवार अर्ज करण्याची मुदत होती. त्यास १५ एप्रिलपर्यंत वाढ देण्यात आली होती. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली शहर पोलीस आयुक्तालयात रिक्त ११८ पदे, तर जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण दलातील रिक्त ३२ जागांसाठी भरती प्रक्रिया होत आहे. भरतीसाठी शहर आयुक्तालयाकडे सुमारे १५ हजार, तर नाशिक ग्रामीणकडे सुमारे नऊ हजार उमेदवारांनी अर्ज केले आहेत, तर राज्यातील १७ हजार ४७१ रिक्त जागांसाठी राज्यभरातून १७ लाख अर्ज आल्याचे सूत्रांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता जारी करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक कामकाजासाठी पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. बंदोबस्तासह कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलीस यंत्रणा व्यस्त आहे. त्यामुळे भरतीची पुढची प्रक्रिया जूनअखेरपर्यंत थांबविण्यात आली आहे. जूनमध्ये निवडणूक संपेल. त्यानंतर पोलीस भरतीची पुढची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

# माणगावमध्ये 'निधी आपके निकट'

**नवी मुंबई : बातमीदार**

निधी आपके निश्चत- २.० भविष्यनिर्वाह निधीचे सदस्य, नव्याने अंतर्भूत असलेल्या संस्था आणि पेन्शनधारकांसाठी सुरू आहे. या वेळी पीएफ खातेदार, नवीन समाविष्ट संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय यांनी 'निधी आपके निकल २.०' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

माणगाव तालुक्यातील पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. कंपनीमध्ये सोमवारी (दि.२९) हा कार्यक्रम होणार असून नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## दुखवटा

### यशवंतराव मोरे



**चौक** : कोयना धरण प्रकल्पग्रस्त जनतेचा आधारस्तंभ आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे यशवंतराव गोपाळराव मोरे यांचे गुरुवारी (दि.१८) पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते. रायगड, ठाणे, पालघर, सातारा, रत्नागिरी येथे विखुरलेला कोयना धरण प्रकल्पग्रस्त जनतेला एकसंघ ठेऊन त्यांच्या नागरी सुविधा, पर्यायी जमीन, प्रकल्पग्रस्त दाखला, कला, क्रीडा, सामाजिक बांधिलकीसाठी सातत्याने त्यांनी पाठपुरावा केला. त्यांच्या निधनाने प्रकल्पग्रस्तांमध्ये शोककळा पसरली आहे.

### लक्ष्मण कर्णुक



**कर्जत** : कर्जत नगर परिषद हद्दीतील मुद्रे (बुद्रुक)मध्ये राहणारे लक्ष्मण परशुराम कर्णुक यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ६९ वर्षांचे होते. त्यांना या परिसरात अंकल म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### कारच्या धडकेत एक जण जखमी

**मोहोपाडा :** कराडे गावच्या हद्दीत पायी जात असताना कारने धडक देवून अपघात झाला आहे. कराडे गावच्या हद्दीत दिवा ॲन्टीलिया बिल्डींगच्या समोरील खारपाडा ते सावरोली रोडवर फिर्यादी (रा. बेलेंतरा सोसायटी कराडे खुर्द) यांचे वडील हे कामावर पायी जात असताना दिवा ॲन्टीलिया सोसायटीसमोरील खारपाडा सावरोली या दिशेने जाणारी अज्ञात कारची पाठीमागून ठोकर बसली. यात त्यांच्या हातापायास, कमरेवर व डोळ्याच्या भूवई वरती दुखापत झाली आहे. कारचालक अपघाताची खबर न देता सावरोली बाजुकडे पळून गेला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहेत.

### मानघर येथील हातभट्टीवर कारवाई

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी तालुक्यातील मानघर येथील हातभट्टीवर धडक कारवाई केली आहे. येथील मिक्सर प्लॅन्टच्या पुढे नदीच्या बाजूला एका व्यक्तीने हातभट्टी लावल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सूर्यकांत कुडावकर यांना मिळताच त्यांनी याबाबतची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना दिली व त्यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने छापा टाकला. त्या ठिकाणी असलेले पत्र्याचे डबे, कच्या दारूचे गूळ नवसागर मिश्रीत द्रव्य, फ्लॅस्टिकचे बॅरल व इतर साहित्य हस्तगत केले आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

### उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाया

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग पनवेलने मद्यपी ग्राहक आणि दारूचा गुत्ता चालविणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या कारवाईत हातभट्टीच्या दारूवर कारवाई करण्यात आली. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पनवेल शहर विभाग यांच्या पथकाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दारुच्या सार्वजनिक गुत्त्यावर दारुबंदी कायद्यांतर्गत छापा टाकून केलेल्या गुन्हा अन्वेषण कारवाईमध्ये मद्य सेवन करणाऱ्या सहा मद्यपी ग्राहकांना व दारुचा गुत्ता चालविणाऱ्या दोन व्यक्तींना अटक करण्यात आली. या प्रकरणी मद्यपी ग्राहकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच एक हातभट्टी निर्मिती ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून विदेशी मदय, बियर, रसायन असा ७९ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# महायुतीचे उमेदवार बारणेंच्या विजयाचा निर्धार

## पनवेल प्रभाग क्रमांक २०मध्ये प्रचाराचा शुभारंभ; आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ मतदार संघात भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांना पनवेल विधानसभा मतदारसंघातून जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी महायुतीचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. महायुतीच्या उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांनी केलेली कामे लोकांपर्यंत जाऊन पोहचवत आहेत तसेच त्यांचे धनुष्यबाण चिन्हही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचा महायुतीचे कार्यकर्ते प्रयत्न करत आहेत.

बुधवारी (दि. १७) पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २०मध्ये प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. तक्का गावातील जरीमरी मंदिरात जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात केली. दरम्यान, मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.

या वेळी पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नागसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, संदीप बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, राजू बगाटे, शिवसेना उप शहरप्रमुख अर्जुन परदेशी, सागर बहिरा, बबन कांबळे, तौफिक बागवान, गुलाब बागवान, रसूल बागवान, अब्दुल आलम, जरीना शेख,रवींद्र कपाले, बाबासाहेब जगदाळे, महेश राऊळ, अतुल बहिरा, रोशन कोळी, अक्षय भगत, आफताब ताडे यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



(छाया : अक्षय शार्दुल)

## पनवेल ग्रामीण भागातही जोरदार प्रचार; भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ मतदार संघात भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांना पनवेल विधानसभा मतदारसंघातून जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी गुरुवारी (दि. १८) पनवेल विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील पालेबुद्रुक, कोळवाडी, वलप या गावांमध्ये प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

प्रचारावेळी माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजपचे नेते एकनाथ देशेकर, प्रकाश खैरे, नाथा आगलावे, प्रभाकर पाटील, दीपक उलवेकर, कृष्णा पाटील, बुधाजी मोरावकर, संजोग पाटील, अंकुश पाटील, नवनाथ खुटारकर, जीवन पाटील, जगन्नाथ पाटील, केशव टेंभे, अविनाश उलवेकर, दिलीप पाटील, अशोक उलवेकर, मिलिंद मोरावकर, डॉ. संतोष आगलावे, दगडू आगलावे, सोपान आगलावे, भास्कर आगलावे, जनार्दन आगलावे, जितेश म्हात्रे, दिनकर बारसे यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.





**पनवेल : भाजपचे पनवेल विधानसभा विस्तारक अमरीश मोकल यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रीतम म्हात्रे, केदार भगत आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)



**पनवेल : भाजप सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, मोतीराम कोळी, पवन भोईर, आप्पा गायकवाड, अविनाश गायकवाड आदी.**

## उरणमध्ये मुलांसाठी 'कलात्मक' कार्यशाळा



**उरण : वार्ताहर**

मुलांच्या उपजत असलेल्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भक्ती पाठारे या युवतीने एक अनोखा उपक्रम राबविला. पाठारे कुटुंब म्हणजे विविध कलागुणांचा वारसा असलेले कुटुंब त्याच कुटुंबातील भक्ती ही युवती. ती स्वतः इंन्टीयर डिझायनर आहे. तिने ५ ते १२ या वयोगटातील मुलांसाठी नैसर्गिक रंग तयार करून क्राफ्ट, बोटांच्या ठशातून कलाकृती, रेखाटन, चित्रकला या विषयावर मार्गदर्शन करून त्यांच्याकडून करून घेतले.

कॉफी आणि हळद यांचा वापर करून मुलांना बेसिक रंग कसे वापरायचे व त्यातून आपली हस्तकला, चित्रकला कशी साकार करायची हे शिकवले. ही कार्यशाळा उरणमधील पाठारे वाडी या ठिकाणी १२ ते १४ एप्रिल सकाळी १० ते ११.३० या वेळेत घेण्यात आली. या शिबिराचे अगदी अल्प शुल्क २०० रुपये इतके होते त्या पैशात उपक्रमाकरिता लागणारे साहित्य मुलांना देण्यात आले. कार्यशाळेत एकूण १५ मुलांनी सहभाग घेतला होता.

## पनवेल महापालिका इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आय टीच स्कुल्स यांच्या संयुक्त विद्यमाने इंग्रजी माध्यमाचे स्टेट बार्डचे दुसरी व पाचवीचे वर्ग सुरू करणार आहे. या वर्गांमध्ये प्रवेश देण्यासाठी अर्ज मागविण्यास गुरुवारी (दि. १८) सकाळी १० वाजल्यापासुन सुरुवात झाली. या प्रवेश प्रक्रियेला पहिल्याच दिवशी नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून आला. सुमारे ४० प्रवेश अर्ज भरण्यात आले. १० मे २०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत हे प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार आहेत. २० मे २०२४ रोजी सकाळी ११ वाजता प्रवेशासाठीची लॉटरी जाहीर होणार आहे. हे प्रवेश अर्ज भरण्याची वेळ सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत राहील, अशी माहिती पनवेल महानगरपालिकच्या वतीने देण्यात आली आहे.

सध्याच्या शैक्षणिक वर्षामध्ये आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता २ री ते ५ वी च्या वर्गांचे एक- एक वर्ग सुरु करण्यात येणार असुन सदर वर्गातील ४० विद्यार्थ्यांची (२० मुले व २० मुली) क्षमता असणार आहे.



पनवेल महापालिकेच्या हद्दीतील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेमध्ये प्राधान्य राहणार आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी बालकाचे जन्म प्रमाणपत्र, बालकाचे आधार कार्ड, पालकाचे आधार कार्ड/मतदार ओळखपत्र आवश्यक आहे. तर पालकाचे रहिवासी पुरावा म्हणुन रहिवासी दाखला/विजबील/टेलिफोन बिल/पाणीपट्टी/रेशनिंग कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना/पनवेल महानगरपालिकेचा कर भरल्याची पावती/राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक/भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडे करारनाम्याची प्रत यापैकी कोणतेही एक कागदपत्रे आवश्यक आहेत.

पनवेल महापालिकेने इंग्रजी माध्यमाची पूर्व प्राथमिक शाळा सुरू केल्यानंतर त्याला महापालिका कार्यक्षेत्रातून मोठा प्रतिसाद मिळाला. आता महापालिकेने इंग्रजी माध्यमाचे दुसरी ते पाचवीपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठीचे प्रवेश अर्ज लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटल व आगरी समाज हॉल समोर, पनवेल येथे उपलब्ध करण्यात आहेत. अधिक माहितीसाठी ७७१००८३८७७ अथवा ९९३०११९०३० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पनवेल महापालिकेकडून करण्यात आले आहे.

## शंभरहून अधिक वर्षांची परंपरा असणारा रामनवमी सोहळा पनवेलमध्ये उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**

चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज पनवेलच्या वतीने दरवर्षी चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी राम नवमी साजरी केली जाते. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाजाच्या श्री लक्ष्मीनारायण मंदिरामध्ये शंभरपेक्षा अधिक वर्षे कालखंडापासून रामनवमी पारंपारिक पद्धतीने साजरी केली जाते. यंदाच्या वर्षीदेखील बुधवारी (दि. १७) मोठ्या उत्साहात भक्तीपूर्ण वातावरणात आणि पारंपारिक चालीरीतीप्रमाणे श्रीराम जन्म सोहळा साजरा करण्यात आला.



सीकेपी समाजाच्या स्नेहश्री महिला मंडळाच्या वतीने सुश्राव्य गीत सेवा अर्पण केली जाते. सांगितिक पूजनाने श्री राम जन्म सोहळ्याला सुरुवात होते. गणेश स्तुती सादर करून सांगीतिक पूजेस प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर परंपरेनुसार सुंदर फुलांनी सजविलेल्या छोटेखानी शिस्वी लाकडाच्या पाळण्यात प्रभू श्रीरामांची मूर्ती झुलविण्यात आली.

यंदाचे वर्षी संतोष देशपांडे व कोमल देशपांडे या उभयतांच्या हस्ते श्री राम पूजन झाले. ठीक १२ वाजून ४० मिनिटांनी उपस्थित माता-भगिनींनी श्री रामाचा पाळणा झुलवत सुप्रसिद्ध पाळणा गीत सादर केले. त्यानंतर प्रभू श्रीरामांची महाआरती झाली.आरतीनंतर मिलिंद देशपांडे यांनी केलेल्या पारंपारिक सुंठवड्याचा प्रसाद सगळ्यांना वाटण्यात आला. स्नेहश्री महिला मंडळाच्या गौरी राजे, स्मिता सबनीस, संपदा देशपांडे, वैशाली कुळकर्णी, कविता चित्रे, अश्विनी देशमुख, स्मिता कुळकर्णी, स्नेहा दिघे, अनिता कुळकर्णी, रोहिणी देशपांडे, श्रद्धा कुळकर्णी यांनी सुंदर रामगिते उपस्थितांसमोर सादर केली. सोहळ्यानंतर सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

सीकेपी समाज पनवेलचे अध्यक्ष योगेश राजे व त्यांच्या विश्वस्त सहकारी व पदाधिकाऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने साजरा केला जाणारा हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित केला होता. यावर्षी बी पी मरीन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी देखील उत्साहाने सोहळ्यात सहभागी होत त्यांच्या वतीने केळी आणि हलव्याचा प्रसाद प्रभू श्री रामचंद्रांच्या चरणी अर्पण केला.

## उष्माघातापासून स्वत:चा करा बचाव

### पनवेल मनपाचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस अधिक वाढू लागली आहे. अशावेळी उष्माघात होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक असल्याचे आवाहन प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी केले आहे.

वाढत्या उष्णतेमुळे शरीराचे तापमान वाढून उष्माघात होण्याची शक्यता असते. राज्य शासनाकडील आपत्ती व्यवस्थापनाने देखील उष्माघाताच्या अनुषंगाने आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अशा व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने घेऊन जावे तसेच शरीरावरील कपड्यांवर पाणी मारावे, शक्य असल्यास व्यक्तीला वारा घालावा. उष्णतेचा अधिक त्रास झाल्यास नागरिकांनी महापालिकेच्या आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये उपचार घ्यावे. महानगरपालिकेच्यावतीने उष्माघाताच्या रूग्णांसाठी खबरदारी म्हणून प्रत्येक प्रभाग समितीमधील एका आरोग्यवर्धिनीकेंद्रामध्ये शीतगृह असे पाच शीतगृह उभारण्यात आले आहेत. तसेच उर्वरीत १० नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दोन आपला दवाखना व ६आरोग्य वर्धिनी उपकेंद्रामध्ये एअर कुलर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे रूग्णांना बाहेरील तापमानापेक्षा कमी तापमानात ठेवून तात्पुरता दिलासा मिळू शकणार आहे. याचबरोबर कोल्ड स्पजिंग व उष्णतेमुळे त्रास होणाऱ्या रूग्णांसाठी महापालिकेच्या नागरी प्राथमिक ओआरएस कॉर्नर तयार करण्यात आले आहे, असे आयुक्त प्रभारी आयुक्त डॉ. रसाळ यांनी म्हटले आहे.



**उन्हात उपाशीपोटी घराबाहेर पडल्यास चक्कर तसेच सनस्ट्रोक होण्याची भिती असते. त्यामुळे नागरिकांनी उपाशीपोटी घराबाहेर पडू नये. तसेच सतत पाणी पिणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याची बाटली सोबत ठेवा. दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान उन्हाचा पारा जास्त असतो. त्यामुळे या काळामध्ये घराच्या बाहेर पडणे टाळावे.**
**-डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल**

### ही आहेत उष्माघाताची लक्षणे

खालील लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा...

**प्रौढांमधील लक्षणे –**

शरीराचे तापमान १०४ फॅरन्हाईटपर्यंत (४० डिग्री सेल्सिअस) पोहचल्यास

१. तीव्र डोकेदुखी २. स्नायूंचे अखडणे ३.मळमळणे, उलटीचा भास होणे ४. चक्कर येणे ५. हृदयाचे ठोके वाढणे, धडधडणे

**लहान मुलांमधील लक्षणे –**

१. आहार घेण्यास नकार २. चिडचिड होणे ३.लघवीचे कमी झालेले प्रमाण ४. शुष्क डोळे ५. तोंडाच्या येथील त्वचा कोरडी होणे

## संपादकीय

# लोकशाहीचा उत्सव

यंदाची सार्वत्रिक निवडणूक दिसते तशी साधीसोपी नाही. या वेळी पहिल्यांदाच देशहिताला प्राधान्य द्यायचे की अराजकाला निमंत्रण द्यायचे हा मूलभूत प्रश्न ऐरणीवर आला आहे. २०४७ सालापर्यंत ठरल्याप्रमाणे भारताला विकसित देशांच्या रांगेत नेऊन बसवायचे असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करायलाच हवेत. निदान देशातील बहुसंख्य जनतेची हीच अपेक्षा आहे.

**जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशातील उत्सवाला आज शुक्रवारी प्रारंभ होईल. लोकसभेच्या ५४३ जागांपैकी १०२ मतदारसंघातील उमेदवारांचे भविष्य आज (शुक्रवारी) सायंकाळपर्यंत मतदानयंत्रात बंदिस्त होईल. गेल्या दोन महिन्यांपासून लोकसभा निवडणुकीची धामधूम देशभर सुरू आहे. महाराष्ट्र देखील त्यास अपवाद नाही. देशभरात सात टप्प्यांमध्ये मतदान पार पडणार असले तरी अखेरच्या टप्प्यातील उमेदवारांची निश्चिती अद्याप अनेक ठिकाणी झालेली नाही. त्यामुळे विविध राजकीय पक्ष आणि आघाड्यांमध्ये उमेदवारीवरून धुसफूस आणि कुरघोड्या सुरूच आहेत. अनेक ठिकाणी उमेदवारी टांगणीला लागल्यामुळे मतदानाचा पहिला टप्पा येऊन ठेपला तरीही निवडणुकीचा अंदाज लावणे कठीण होऊन बसले आहे. पहिल्या टप्प्यात मतदान होणाऱ्या देशातील १०२ मतदारसंघांमध्ये महाराष्ट्रातील पाच मतदारसंघांचा समावेश आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार हे पहिल्या टप्प्यातील महत्त्वाचे उमेदवार आहेत. उपराजधानी नागपूरमधून गडकरी यांच्यापुढे काँग्रेसचे विकास ठाकरे उभे ठाकले आहेत. तर मुनगंटीवार यांच्यापुढे काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांचे आव्हान आहे. यासह पूर्व विदर्भातील भंडारा-गोंदिया, गडचिरोली, रामटेक या मतदारसंघांमध्येही मतदान होईल. नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोलीमध्येही दुर्गम ठिकाणी मतदान पार पाडण्याचे आव्हान निवडणूक यंत्रणेसमोर असेल. पहिल्या टप्प्यातील १०२ मतदारसंघ २१ राज्यांमध्ये विखुरलेले आहेत. यामध्ये आठ केंद्रीय मंत्री आणि दोन माजी मुख्यमंत्र्यांचे भवितव्य मतदानयंत्रांमध्ये बंदिस्त होईल. भाजपचे किरेन रीजीजु, सर्वानंद सोनोवाल, विप्लब देब, काँग्रेस नेते कमलनाथ यांचे चिरंजीव नकुलनाथ, काँग्रेस नेते पी. चिंदबमरम यांचे पुत्र कार्ती चिदंबरम, द्रमुकच्या कन्नीमोळी अशा अनेक दिग्गज नेत्यांचा उमेदवारांमध्ये समावेश आहे. सात टप्प्यांमधील विस्तृत निवडणूक कार्यक्रम राबवला जात असल्यामुळे काही बाबी ठळकपणे दिसून येतात. एरव्ही निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला की प्रचाराला काही विशिष्ट दिशा मिळत जाते. अनेक ठिकाणी स्थानिक प्रश्नदेखील प्रामुख्याने चर्चेत येतात. यंदा तसे फारसे होताना दिसत नाही. भाजपकडून राममंदिर उभारणी किंवा जम्मू काश्मीरमधील ३७०वे कलम रद्द केल्याच्या वचनपूर्तीचे दाखले दिले गेले. पंतप्रधान मोदी यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे भाजपने समोर ठेवलेले विकसित भारताचे स्वप्न जनतेला विश्वासार्ह वाटते. याउलट सर्वसामान्यांचे दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडवण्यात मोदी सरकारला अपयश आल्याची बेगडी टीका इंडिया आघाडीतर्फे करण्यात येत आहे. तसेच राज्य घटनेला धोका निर्माण झाल्याचा मुद्दाही इंडिया आघाडीने केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय पातळीवरील या मुद्यांमुळे स्थानिक पातळीवरील समस्या आणि अन्य प्रश्न प्रचारातून अदृश झालेले दिसतात. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांत उन्हाचा पारा चाळिशीच्या पलीकडे गेल्यामुळे मतदारांना घराबाहेर काढण्यासाठी सर्वच पक्षांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. अर्थात देशभर पसरलेला निवडणूक ज्वर पाहता यंदा मतदान करायला लोक मोठ्या संख्येने बाहेर पडतील, अशी आशा बाळगायला हरकत नाही. किंबहुना तसे घडायला हवे.**

# भारतीय क्रांतिकारक अनंत कान्हेरे

अनंत लक्ष्मण कान्हेरे हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक होते. ते गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संघटनेचे सदस्य होते. नाशिकचा कलेक्टर ए.एम. टी. जॅक्सन याची हत्या करणारे अनंत कान्हेरे हे खुदीराम बोस यांच्यानंतरचे सर्वांत तरुण वयाचे भारतीय क्रांतिकारक ठरले. अनंत कान्हेरे यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



अनंत कान्हेरे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील आयनी मेटे या गावात ७ जानेवारी १८९२ रोजी झाला. त्यांना दोन बहिणी आणि दोन भाऊ होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण इंदूर येथे तर माध्यमिक शिक्षण औरंगाबाद येथे झाले. १त्यांच्या मोठ्या भावाचे नाव गणपतराव आणि धाकट्या भावाचे नाव शंकरराव होते.

कान्हेरे १९०३ मध्ये आपल्या काकांकडे पुढील शिक्षणासाठी औरंगाबादला गेले. त्यांचे भाऊ गणपतराव बार्शी येथे राहत होते. त्यांच्याकडे काही काळ राहून १९०८ मध्ये ते पुन्हा औरंगाबादला परत गेले. तेव्हा ते गंगाराम रुपचंद श्रॉफ यांच्या घरात भाड्याने राहत असत. गंगाराम यांचा येवल्यात टोणपे नावाचा एक मित्र होता. त्या काळात अनेक गुप्त क्रांतिकारी संस्था कार्यरत होत्या. नाशिकमधील एका गुप्त संस्थेचा टोणपे हे सदस्य होते. गणू वैद्य आणि गंगाराम एकदा नाशिकमधील गुप्त क्रांतिकारी संस्थेसाठी शस्त्रे खरेदी करण्यासाठी केले होते. या वैद्यांशी कान्हेरे यांची ओळख झाली. नंतर कान्हेरे यांनी त्या दिवसातील मैत्रीबद्दल 'मित्र प्रेम' नावाची कादंबरी लिहिली. कान्हेरे क्रांतिकारी गटांच्या कार्याकडे आकर्षित झाले. सावरकर बंधूंनी नाशिक येथे अभिनव भारत संस्थेची स्थापना केली होती. कृष्णाजी गोपाळ कर्वे यांनी बाबाराव सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली अशाच एका गुप्त गटाची स्थापना केली होती.

या संस्थेचे दुसरे सदस्य विनायक नारायण देशपांडे होते. सावरकर बंधू, मदनलाल धिंग्रा यांच्याकडून स्फूर्ती घेऊन अनंत कान्हेरे ह्यांनी नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याला ठार मारण्याचे ठरविले. त्याला कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे अशा समवयस्क साथीदारांची जोड मिळाली.

जॅक्सनची मुंबई येथे वरच्या पदावर बदली करण्यात आली. त्याला नाशिक येथेच मारणे जास्त सोपे होते. २१ डिसेंबर १९०९ या दिवशी नाशकातल्या विजयानंद थिएटरमध्ये 'शारदा' या नाटकाचा प्रयोग जॅक्सनच्या निरोप समारंभासाठी ठरला होता. जॅक्सन मराठी भाषेचा आणि नाटकांचा चाहता असल्याने या प्रयोगास येणार होताच. नाटकाचा प्रयोग सुरू होण्याची वेळ झाली, सर्वजण आपापल्या जागेवर स्थानापन्न होत असताना अनंत कान्हेरे ह्यांनी जॅक्सनवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. जॅक्सन जागीच ठार झाला. अनंत कान्हेरे आपल्या जागेवरच शांतपणे उभे राहिले, त्यांना अटक करण्यात आली. कान्हेरे, कर्वे आणि देशपांडे यांच्यावर खटला भरण्यात आला.

२० मार्च इ.स. १९१० रोजी तिघांनाही फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. १९ एप्रिल १९१० या दिवशी तिघांनाही ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. ठाण्याच्या तुरुंगात अनंत कान्हेरे यांचे स्मारक आहे. नाशिकमध्ये 'अनंत कान्हेरे' नावाचे क्रिकेटचे मैदान आहे. (साभार : विकिपीडिया)

# प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक



ताराबाई मोडक या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक. ताराबाई या चाकण (जि. पुणे) येथील केळकर घराण्यातील. त्यांचा जन्म १९ एप्रिल १८९२ रोजी मुंबई येथे झाला. वडिलांचे नाव सदाशिवराव व आईचे उमाबाई. वडील सुबोध पत्रिका या साप्ताहिकाच्या संपादनाबरोबरच हितोपदेश, कामगार ही साप्ताहिक आणि ज्ञानदीप हे मासिक चालवत असत. आईही स्त्री शिक्षण, विधवा विवाहासाठी काम करत असे. बुद्धिमान व सुधारणावादी आईवडिलांमुळे ताराबाईंकडे बुद्धिमत्तेचा वारसा आला. १९१४ मध्ये ताराबाई मुंबई विद्यापीठातून बी. ए. झाल्या. त्यांनी कृष्णा वामनराव मोडक यांच्याशी १९१५ मध्ये नोंदणी पद्धतीने प्रेमविवाह केला. त्याला दोन्ही घरच्या लोकांचा विरोध होता.

ताराबाईंनी १९२२ मध्ये राजकोट येथे बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये लेडी सुपरिटेंडन्ट म्हणून रुजू झाल्या. या पदावर काम करणार्या त्या पहिल्या भारतीय महिला होत. त्यानंतर त्यांनी गिजुभाई बधेका यांच्या साह्याने भावनगर येथे माँटेसरीच्या तत्त्वांवर आधारलेली 'गीता शिक्षण पद्धती' निश्चित केली. हाच ताराबाईंच्या बालशिक्षण कार्याचा प्रारंभ होय. शिक्षणाचा खरा पाया मुलांच्या बालवयातच घातला जाण्याची शक्यता व आवश्यकता असते, या दृष्टीने त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणाचे नवीन पाऊल टाकले. १९२३-१९३२ ही नऊ वर्षे त्यांनी भावनगरच्याच दक्षिणामूर्ती शिक्षणसंस्थेत प्राध्यापिका म्हणून काम केले. १९३३ पासून त्यांनी शिक्षणाबाबतची शिक्षणपत्रिका काढायला सुरुवात केली. १९३६ साली त्यांनी नूतन बालशिक्षण संघाची स्थापना केली. पुढे बालशिक्षणाचे हे लोण महाराष्ट्रात पसरले. १९३६-१९४८ या काळात त्यांनी मुंबई-दादरच्या हिंदू कॉलनीत शिशुविहार नावाची संस्था स्थापन करून बालशिक्षणाचे प्रसारकार्य केले. या संस्थेने पुढे पूर्वप्राथमिक अध्यापन मंदिर सुरू केले. यातून मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषांच्या हजारांहून अधिक शिक्षक-शिक्षिकांचे प्रशिक्षण झाले.

ताराबाईंनी गिजुभाईंच्या मृत्यूनंतर पुढील १२ वर्षे नूतन बालशिक्षण संघाची धुरा वाहिली. ग्रामीण भागात बालशिक्षणाचा प्रसार करणे हे या संघाचे काम होते. खेड्यांमध्ये शास्त्रीय पद्धतीने मात्र कमी खर्चात बालवाड्या चालविण्यासाठी १९४५ मध्ये ताराबाईंनी ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे ग्राम बालशिक्षा केंद्र स्थापिले. या संस्थेतूनच ग्रामीण बालवाडी व ग्राम बाल अध्यापन मंदिर या संस्था निघाल्या. या संस्थांचा लाभ आदिवासी मुलांना मिळावा, म्हणून त्यांच्या आदिवासी परिसरात आणि अंगणात बालवाडी चालविण्याचा उपक्रम करण्यात आला. प्राथमिक शाळेत मुलांची अनुपस्थिती हा गंभीर प्रश्न होता. मुले शाळेत हजर राहावीत म्हणून ताराबाईंनी गृहभेटी, प्रचार फेर्या, दिंडी, मुलांसाठी बैलगाडीची सोय, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले. त्याचबरोबर भातशेती ह्या मूलोद्योगाच्या माध्यमातून विज्ञान, गणित, भाषा हे विषय शिकविण्याचा प्रयत्न केला.

यामुळे मुलांना शिक्षण घेण्यात गोडी देखील वाटू लागली. शहराच्या ठिकाणाहून कोणतेही शैक्षणिक साधने न आणता त्यांनी विद्यार्थ्यांना रंग, स्पर्श, वजन मापन, अंक, आकार इत्यादी संकल्पना समजावे यांकरिता पिसे, बांगळ्या, शंख, दगडं, बिया, माती, रेती, बांबुफळे, डब्या इत्यादी स्थानिक वस्तूंचाच वापर केला. ताराबाईंच्या आयुष्याची चित्तरकथा जितकी विलक्षण आहे, तितकीच ती त्यांच्याविषयीचा आदर दुणावणारी आहे. पावलोपावली भिडणारी प्रतिकूल परिस्थिती त्यांनी संकट म्हणून न स्वीकारता संधी म्हणून स्वीकारली आणि निव्वळ मार्गच काढला नाही, तर त्यातून सुंदर संकल्पना घडवल्या. वैयक्तिक होरपळीचे प्रतिबिंबना कधी त्यांच्या स्वभावावर,ना व्यक्तिमत्त्वावर आणिना कधी त्यांच्या कार्यावर पडले.

ताराबाईंची कर्मभूमी ठाणे जिल्ह्यातली असली, तरी त्यांच्या कार्याने फक्त तेवढ्याच भागाला फायदा झाला नाही, तर त्यांचे कार्य खेड्यातील आणि आदिवासी भागातील बालशिक्षण तंत्राचे एक देशव्यापी 'मॉडेल' बनले. पद्मभूषण ताराबाई मोडक यांचे ऑगस्ट ३१ इ.स. १९७३ ला मुंबईत निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

### बेस्ट बॅटरी लाईफ असणारे 'हे' स्मार्टफोन्स स्वस्तात खरेदी करा

सध्या स्मार्टफोन ही काळाची गरज आहे. शाळा, कॉलेज, ऑफिसमधील अनेक महत्त्वाच्या कामांसाठी स्मार्टफोनचा उपयोग होतो. स्मार्टफोन खरेदी करताना त्याची बॅटरी लाइफ दीर्घकाळ चालणारी आहे का हे तपासून घेणे फायदेशीर ठरेल. तर आज आम्ही तुम्हाला अशा पाच स्मार्टफोन्सची यादी सादर करणार आहोत. २५ हजार रुपयांपेक्षा कमी किमतीच्या या सर्व स्मार्टफोन्सची बॅटरी लाइफही उत्तम आहे.



✻ वनप्लस नॉर्ड सीई४ : वनप्लसच्या या स्मार्टफोनमध्ये ५,५०० mah बॅटरी पॅक आहे. त्यामध्ये १०० डब्ल्यू फास्ट चार्जिंग सपोर्टदेखील आहे, जो फक्त ३० मिनिटांत तुमचे डिव्हाइस पूर्णपणे चार्ज करू शकतो. या स्मार्टफोनमध्ये Snapdragon ७ Gen ३ SoC, ८ जीबी रॅम व १२८ जीबी स्टोरेज यांसारखी फीचर्स आहेत तसेच या स्मार्टफोनची किंमत फक्त २४,९९९ रुपये आहे.

✻ ऑनर एक्स ९ बी ५ जी : ऑनरच्या या स्मार्टफोनमध्ये ५,८०० mah बॅटरी पॅक आहे, पण हा स्मार्टफोन फास्ट चार्जिंगला सपोर्ट करीत नाही. ३५ डब्ल्यू चार्जिंग सपोर्टसह हे डिव्हाइस पूर्णपणे चार्ज होण्यासाठी जवळजवळ दोन तास लागतात. या स्मार्टफोनचीही किंमत २४,९९९ रुपये आहे.

✻ सॅमसंग गॅलॅक्सी एफ ५४ ५जी : सॅमसंगचा हा स्मार्टफोन ६,००० mah बॅटरीसह येतो. हा स्मार्टफोन २५ डब्ल्यू चार्जिंगला सपोर्ट करतो. हा स्मार्टफोन चार्ज होण्यास दोन तास लागत असले तरी त्याची बॅटरी लाइफ पूर्ण दिवस टिकून राहू शकते तसेच या बजेट फ्रेंडली स्मार्टफोनची किंमत २२,९९९ रुपये आहे.

✻ मोटोरोला जी ५४ : तुम्ही २० हजार रुपयांपेक्षा कमी किमतीचा व उत्तम बॅटरी लाईफ असणारा स्मार्टफोन शोधत असाल, तर Motorola G५४ हा एक चांगला पर्याय आहे. १८,९९९ रुपयांच्या किमतीचे हे डिव्हाइस ३३W जलद चार्जिंगला सपोर्ट करते आणि ६,००० mah बॅटरी लाइफ देते. तसेच लवकरच ६,००० mah बॅटरीला सपोर्ट करणारा मोटोरोलाचा जी ६० स्मार्टफोन भारतात लाँच होणार आहे.

✻ इंटेल पी४० प्लस : itel P४०+ हा स्मार्टफोन ७,००० mah बॅटरी लाईफसह येतो. या स्मार्टफोनची बॅटरी दोन दिवसांपर्यंत टिकून राहू शकते तसेच या स्मार्टफोनची किंमत फक्त ८,५०० रुपये आहे.

# स्वातंत्र्यसैनिक डॉ. उत्तमराव पाटील

महान स्वातंत्र्यसेनानी डॉ. उत्तमराव गिरधर पाटील यांची आज जयंती. उत्तमराव अर्थात नानासाहेब पाटील ही राज्यच नव्हे, तर देशपातळीवरच्या राजकीय पटलावरील बडी आसामी. जळगाव जिल्ह्यातील मळगाव हे छोटेसे खेडे जन्मभूमी असली तरी कर्मभूमी म्हणा वा कार्यक्षेत्राने धुळ्यासह अवघा महाराष्ट्र त्यांनी व्यापून टाकला. जनसंघाचे पाईक म्हणून कार्याला सुरुवात केली अन् हयातभर त्याच भूमिकेत वावरताना सर्वोत्तम स्वयंसेवक म्हणून नावारूपाला आले.



निमित्त

धुळे जिल्ह्याची मागास जिल्हा म्हणून पूर्वापार ओळख. हा जिल्हा काँग्रेसवाल्यांचा पारंपरिक बालेकिल्ला म्हणूनही सर्वदूर ओळख प्रस्थापित करता झाला. अशा या जिल्ह्यामध्ये प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जात तेव्हाच्या जनसंघाचे वा आताच्या भाजपचे अन् पर्यायाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम आदिवासी पट्ट्यात म्हणजेच तळागाळापर्यंत नेण्याची महत्तम कामगिरी नानासाहेबांनी केली. पक्ष, संघटना, त्यात तळमळीने कार्यरत असणारा प्रत्येक लहान-मोठा कार्यकर्ता, त्याचे सुख-दु:ख समजून घेणारा तसेच प्रसंगी त्याच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणून नानासाहेबांची ओळख राहिली. नानासाहेबांच्या परीसस्पर्शामुळे अनेकांच्या राजकीय जीवनाचे सोने झाले. ऐंशीच्या दशकामध्ये भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले अध्यक्ष झालेले उत्तमराव पाटील यांनीच १९८४मध्ये पक्षाच्या अध्यक्षपदाची सूत्रे मुंडे महोदयांकडे सुपूर्द करतानाच यापुढे पक्षात कोणतेही पद न घेण्याचा निर्धारही जाहीर केला होता. त्या निर्णयावर नानासाहेब अखेरपर्यंत ठाम राहिले.

जळगाव जिल्ह्याच्या भडगाव तालुक्यातील मळगाव नानासाहेबांचे जन्मगाव. बडोदा संस्थानाच्या साहाय्याने उच्च शिक्षण घेतले. वकील झाले आणि नंतर धुळ्यातील नावाजलेले फौजदारी वकील म्हणून ओळखले जाऊ लागले. भारतीय जनसंघाचे धुळे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. १९५४मध्ये जनसंघाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली. पुढच्या सहा वर्षांतच नानासाहेब जनसंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि १९७७च्या सुमारास जनसंघाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या सर्वोच्च पदावर आरूढ झाले होते. साधारणपणे १९५४मध्ये ते पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेचे सदस्य झाले. नानासाहेब १९५७मध्ये खासदार झाले होते. १९७८मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य झाल्यावर विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडे चालून आले. १९८०मध्ये भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले अध्यक्ष म्हणूनही नानासाहेबांचीच निवड झाली. पुढे १९८९मध्ये जळगाव जिल्ह्याच्या एरंडोल लोकसभा मतदारसंघातूनही खासदार म्हणून निवडून गेले होते.

महाराष्ट्र विधान परिषदेतील विरोधी पक्षनेता यासारख्या अत्यंत जबाबदारीच्या पदावर जवळपास एक तपापर्यंत कार्यरत असताना, राजकारण हे लोकहितासाठीच असते या मुद्द्यावर अढळ श्रद्धा असणाजया उत्तमराव पाटलांनी राजकारण्यांनी कुठे थांबले पाहिजे याचा एक वस्तुपाठच कृतीतून घालून दिला. त्यानुसार १९९१मध्ये नानासाहेबांनी वैधानिक राजकारणातून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. (साभार : इंटरनेट)

## क्लिक...क्लिक...!



**उरण : श्रीराम जन्मोत्सव हनुमान कोळीवाडा येथील श्रीराम मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात रोज प्या एक ग्लास बार्लीचे पाणी

सध्या कडक उन्हाळा सुरू झाला असून या काळात लोकांनी स्वत:ला निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यसाठी आरोग्यदायी पेयांचे सेवन करणे गरजेचे आहे. यंदा उन्हाळ्यात तुम्हाला डिहायड्रेशन आणि विविध आजारांपासून दूर राहायचे असेल, तर कोल्ड ड्रिंक्स पिणे टाळून रोज एक ग्लास बार्लीचे पाणी पिऊ शकता.



बार्लीच्या पाण्याच्या सेवनाने शरीर हायड्रेटच राहत नाही, तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही मिळतात. बार्लीच्या सेवनाने कोणते फायदे मिळतात याविषयी आहारतज्ज्ञांनी दिलेल्या माहितीच्या आधारे जाणून घेऊ...

आहारतज्ज्ञ लीमा महाजन यांच्या मते, अनेक वर्षांपासून मूत्रमार्गाचा संसर्ग, केस अकाली पांढरे होणे, किडनी स्टोन हे त्रास होत असतील तर आणि स्तनदा मातांना दुधाचा पुरवठा वाढविण्यासाठी बार्लीच्या पाण्याचे सेवन केले जाते.

महाजन यांच्या मते, बार्लीच्या बिया पाण्याचे उकळून, ते पाणी प्यायल्यास तुम्हाला त्वचेसंबंधित आजार, मुरमे आणि चेहऱ्यावरील छिद्रे कमी करण्यासाठी मदत मिळते.

**बार्लीचे पाणी बनविण्याची पद्धत**

✻ बार्ली काही वेळ धुऊन, त्यातील पाणी काढून टाका. त्यानंतर स्वच्छ झालेल्या बार्लीच्या बिया ४.५ कप पाण्यात टाकून सुमारे सहा ते आठ तास भिजत ठेवा.

✻ त्यानंतर हे पाणी १० मिनिटे उकळवा.

✻ मग बार्ली त्यातील पोषक घटक पाण्यात सोडेल. त्यामुळे पाणी मलाईदार पांढरे दिसेल. आता गॅस बंद करा.

✻ अशा प्रकारे तुम्ही बार्लीच्या बिया बाजूला करून, त्याचे पाणी गाळून घ्या.

✻ बार्लीचे पाणी थंड होऊ द्या. त्यानंतर तुम्ही ते पाणी थेट पिऊ शकता किंवा त्यात लिंबाचा रस आणि चवीनुसार मीठ घालू शकता.

**अनेक आरोग्यदायी फायदे**

✻ हायड्रेशन : उन्हाळ्याच्या दिवसांत हायड्रेटेड राहणे महत्त्वाचे आहे आणि बार्लीचे पाणी तुमची तहान शमविण्यास प्रभावीपणे मदत करू शकते.

✻ शरीरात थंडाव्याची निर्मिती : बार्लीच्या पाण्यात शरीरात नैसर्गिकरीत्या थंडावा निर्माण करण्याचे गुणधर्म असतात, ज्यामुळे तुम्हाला उष्णतेवर मात करता येते.

✻ पचनक्रिया सुधारते : बार्लीचे पाणी त्याच्या उत्कृष्ट पाचक गुणधर्मांसाठी ओळखले जाते. त्यात विरघळणारे फायबर असते, जे निरोगी पाचन तंत्र राखण्यास मदत करते.

# कर्जतमधील आषाणे ठाकूरवाडीत पाणीटंचाई

## आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनकडून टँकरने पाणीपुरवठा



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या आषाणे ठाकूरवाडीमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. येथील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने टँकर सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या या वाडीमध्ये आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनकडून टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

माथेरान डोंगरातील १२ आदिवासीवाड्यामधील आषाणे ठाकूरवाडी ही उमरोली ग्रामपंचायतीमध्ये आहे. आषाणे ठाकूरवाडी डोंगरावर वसली असल्याने स्थानिक ग्रामस्थांना उन्हाळा सुरू झाला की, पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.

या वाडीमध्ये ६०० आदिवासी लोकांची वस्ती असून त्यांच्यासाठी असलेल्या दोन्ही विहिरी आटल्या आहेत. त्याबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी उमरोली ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन टँकर सुरू करण्याची मागणी केली. याच वाडीमधील रहिवाशी असलेल्या ठमी सांबरी या उमरोली ग्रामपंचायतीच्या सरपंच आहेत. त्यांनी मनोहर ठाणगे, तुकाराम पिरकर, पदु संबरी, प्रकाश पीरकर, सदस्य राजू पिरकर, मंगल लोते, गणपत सांबरी, भाऊ होले, चंद्रकांत पिरकर, महादू पिरकर, वामन पाचंगे, वामन पारधी, विकास निरगुडा यांच्यासह आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन पाण्याच्या समस्येबद्दल माहिती दिली. या सर्व ग्रामस्थांनी ज्येष्ठ कार्यकर्ते शरद ठाणगे यांच्यासोबत आमदार थोरवे यांची भेट घेतल्यावर आमदार थोरवे यांनी कर्जत पंचायत समितीकडे संबंधित वाडीची सध्याची स्थिती जाणून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

स्थानिक ग्रामस्थांची पाण्यासाठी सुरू असलेली वणवण थांबावी यासाठी खासगी टँकर सुरू करण्याचा निर्णय मनोहर थोरवे यांनी घेतला. ग्रामस्थांची गैरसोय टाळण्यासाठी तत्काळ कर्जत येथून पाण्याचा टँकर घेऊन शरद ठाणगे हे आषाणे ठाकूरवाडीत पोहचले. टँकरमधून आणण्यात आलेले पाणी तेथील विहिरीमध्ये टाकण्यात आले. आज सकाळी आदिवासी ग्रामस्थांनी विहिरीमधून पिण्याचे पाणी भरले आणि अनेक दिवसांनी मुबलक पाणी ग्रामस्थांना मिळाले आहे.

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनकडून माजी नगरसेवक संकेत भासे, युवा सेना विधानसभा अधिकारी प्रसाद थोरवे, कर्जत शहरप्रमुख अभिषेक सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली व उमरोली जिल्हा परिषद उपतालुकाप्रमुख शरद ठाणगे यांनी आषाणे ठाकूरवाडीत दररोज पाण्याचा टँकर पोहचला जाईल, असे आश्वासन आदिवासी ग्रामस्थांना दिले आहे.

# रोहा अष्टमी नगर परिषदेची ७४.७९ टक्के करवसुली

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेची मार्च अखेरपर्यंत २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये विविध करांच्या माध्यमातून ७४.७९ टक्के वसुली झाली आहे.

मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली करवसुलीसाठी पथक नेमण्यात आले होते. २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षाची करवसुली एकूण ४,७४,५०,४३४ रुपये कर वसली होती. नगरपरिषदेने ८५ टक्के करवसुलीचे ध्येय ठेवले होते. नगर परिषदेने वसुलीसाठी प्रशासकीय पाच प्रभागातील प्रत्येकी तीन कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. नागरी सुविधा केंद्रात दोन कॅश काउंटर सुरू करण्यात आले होते. शहराबाहेरील करदात्यांना आवाहन करण्यात आले होते. वेबसाईट तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन पेमेंटसाठी आवहन करण्यात आले होते. नागरिकांनी जास्तीत जास्त कर भरावा यासाठी जनजागृती करीत रिक्षाने दवंडी फिरवण्यात आली होती.



२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या मार्च अखेरपर्यंत जुनी थकबाकीमधील ८९,४४,५३७ रुपये वसूल करण्यात आले. २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षातील करवसुली २,६५,४३,४१६ रुपये करण्यात आले आहे. असे एकूण ३,५४,८७,९५३ रुपये या आर्थिक वर्षाच्या मार्च अखेरपर्यंत वसूल करण्यात आले आहे. एकूण मार्च अखेरपर्यंत ७४.७९ टक्के करवसुली करण्यात आले आहे. या २०२३-२४ चालू आर्थिक वर्षी मागील २०२२-२३ आर्थिक वर्षापेक्षा कर वसुली कमी झाली आहे. मागील आर्थिक वर्षात ७९ टक्के करवसुली करण्यात आली होती.

करवसुली २०२३-२४ चालू आर्थिक वर्षात कमी होण्याची कारणे पाहता यामध्ये प्रामुख्याने शासकीय मालमत्ताची करवसुली कमी झाली आहे. शासकीय कार्यालयांना निधी न मिळाल्याने त्यांचा भरणा झाला नाही. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे शहरांतर्गत असलेले मोबाईल टॉवरचे करवसुली कमी झाली आहे.

रोहा अष्टमी नगर परिषदेला कर भरणा न झाल्यामुळे या मोबाईल टॉवर धारकांवर दूरसंचार विभागाची परवानगी घेतल्याशिवाय कारवाई करता येत नाही. नगरपालिकेने यावर कारवाई करण्यासाठी दूरसंचार पत्रव्यवहार केला आहे. कर वसुली न होण्यामागे अन्य कारणे पाहता, प्रामुख्याने न्यायालयीन प्रकरणात अडकलेले मालमत्ता त्यामुळे या मालमत्तांची वसुली करता आली नाही. शहरातील मोडलेले मालमत्ता नवीन संगणक प्रणालीमध्ये निर्लेखित झाल्याने वसुलीसाठी आकडेवारी कमी दिसून येते.




**अलिबाग : भाजपचे दक्षिण रायगड उपाध्यक्ष राजेश मपारा व अभाविपचे श्रेयस कदम यांच्या संकल्पनेतून नवमतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी 'नमो अगेन' अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत टी-शर्टचे अनावरण राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व गुहागरचे माजी आमदार विनायक नातू यांच्या हस्ते करण्यात आले. हे अभियान २२ एप्रिल ते ७ मेदरम्यान अभियान प्रमुख श्रेयस कदम व वैभव जोशी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार आहे.**

# गुंगारा देणाऱ्या आरोपीला अखेर वडखळ पोलिसांकडून अटक

**पेण : प्रतिनिधी**

फसवणुकीच्या गुन्ह्यातील आरोपी नंदू पाटील हा वारंवार पोलिसांना गुंगारा देत होता, परंतु अखेर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

सेवानिवृत्त शिक्षकाच्या मुलाला रेल्वेत नोकरी लावतो म्हणून १४ लाख ६७ हजार रुपये घेऊन फरार झालेला आरोपी नंदू पाटील गुन्हा दाखल झाल्यापासून गेले चार महिने पोलिसांना गुंगारा देत होता, मात्र वडखळ पोलिसांनी तपासाची चक्रे अधिक जलद गतीने फिरवत आरोपी याला पकडण्यासाठी तपास सुरू ठेवला होता आरोपीची तांत्रिक माहिती काढली. या परिसरात उपनिरीक्षक अभिजीत पाटील,



हवालदार अमित पाटील यांनी पाळत यांनी ठेवून त्याला पकडून अटक केली आहे. आरोपीस न्यायालयात हजर केले असता, त्याला १९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

पुढील तपास वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# रायगड रोप वेवर चौथी ट्रॉली

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर जाण्यासाठी अत्यंत कमी वेळेचा आणि सोपा असा मार्ग असलेला रायगड रोपवे चौथी ट्रॉली बसवली आहे. या ट्रॉलीची चाचणी नुकतीच घेण्यात आली. एकीकडे सुरुवातीस केवळ दोन ट्रॉलींना परवानगी असताना रोपवे प्रशासनाने दोनाचे तीन आणि आता चार ट्रॉली बसवल्या आहेत.

रायगडावर अबालवृद्धांना जाण्यासाठी जोग इंजिनिअरिंग कंपनीने रायगड रोप वेची निर्मिती केली. २०वर्षांहून अधिक हा प्रकल्प शिवप्रेमी आणि पर्यटकांची रायगडावर जाण्या-येण्याची उत्तम सुविधा पुरवत आहे. गडावरील गर्दी पाहता, सध्या अस्तित्वात असलेला रोप वे कमी पडू लागला. त्यामुळे रायगडावर



जाण्यासाठी आणखी एक रोप वे उभा केला जावा, अशी मागणी जोर धरू लागली होती. शासनानेही त्याला दुजोरा दिला.

आता नव्याने रायगड रोप वे प्रशासनाने चौथी ट्रॉली बसवली आहे. या चौथ्या ट्रॉलीचे चाचणी नुकतीच घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी झाली असली तरी अद्याप या चौथ्या ट्रॉलीला घेऊन अजून काही चाचण्या घेण्यात येणार आहेत आणि यशस्वी चाचणी झाल्यानंतर लोकार्पण केले जाईल, असे रायगड रोप वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


एका ट्रॉलीत चार प्रवासी बसविले जात आहेत. त्यामुळे एका वेळी १६ प्रवासी जाणार असून गर्दी काळात हे फायद्याचे होणार आहे. २३ एप्रिल रोजी शिवपुण्यतिथी दिनी लोकार्पण सोहळ्यानंतर ही सुविधा सुरू होण्याची शक्यता आहे.

# म्हसळा शहरातील श्री धावीर देव यात्रेच्या स्वागतासाठी भाविक सज्ज

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरातील श्री धावीर देव यात्रा तिथीप्रमाणे चैत्र शुद्ध चतुर्दशीला होत असते. ती या वर्षी सोमवारी (दि.२२) येत आहे. यात्रेला गावाकडे येण्यासाठी चाकरमानी मंडळींची तयारी झाली आहे. स्थानिक यात्रेचे आयोजक आणि हिंदू ग्रामस्थ यांनी भक्तांचे स्वागताची तयारी केली आहे.

श्री धावीर देव आणि अन्य मंदिरांचे परिसरांतील साफसफाई, पालखी परिसरातील नगरपंचायत हद्दीतील आणि पालखी मार्गावरील रस्त्यांची साफसफाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, तसे निवेदन श्री धावीर देवभक्त विशाल सायकर यांनी दिले आहे. शंकर मंदिर परिसरांतील बापूजी देवस्थान मार्गावरील वादळांत पडलेले झाड आणि मार्ग पावसाळ्यांत खराब झाला आहे. त्याची डागडुजी होणे भक्तांना अपेक्षित आहे. म्हसळ्याचे श्री धावीर देव मंदिर हे प्राचीन असून मुख्यदेव श्री धावीर देव यांच्यासमवेत रवळनाथ, अवळनाथ, बापूजी, जोगेश्वरी, भैरी आणि काळेश्री



अशा देवदेवतांच्या पालखी नगरपंचायत हद्दीतील ब्राह्मण आळी, साईनाथ आळी, गौवळवाडी, कुंभार आळी, कुडेकर बिल्डिंग, बसस्थानक, बाजारपेठ, सोनार आळी, तांबट आळी, एकता नगर, रोहिदास नगर, कन्याशाळा, उमरोटकर-बोरकर परिसरात साफसफाई आणि पोलिसांमार्फत वाहतुकीची व्यवस्था चोख असावी, अशी मागणी केली आहे.

# खोपोलीत रामजन्मोत्सवानिमित्त पालखी सोहळा

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रभू श्रीराम जन्मोत्सव सोहळा खोपोली व खालापूर तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने शहराच्या विविध भागातील मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरांमध्ये भाविकांनी गर्दी केली होती.

शहरात बाजारपेठेतील हनुमान मंदिरात शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली शहरात मुख्य सोहळा श्रीराम नगर येथील श्रीराम मंदिरात जन्मोत्सव सोहळा विविध कार्यक्रमांनी झाला. मंदिरात सकाळपासून काकड आरती, प्रवचन, श्रीराम जन्मोत्सव त्याचप्रमाणे सायंकाळी पालखी सोहळा, दिपोत्सव व रात्री कीर्तन असे विविध कार्यक्रम देवस्थान कमिटीचे अध्यक्ष वसंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली झाले. दीपोत्सव कार्यक्रमाला





आमदार महेंद्र थोरवे व विविध पक्षांच्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती लाभली.

या पालखी सोहळ्याच्या अग्रभागी ढोल-ताशा पथक, माधवी कुवळेकर यांच्या नेतृत्वाखाली महिलांचे लेझीम पथक होते. फटाक्यांची आतिषबजी व श्रीरामाच्या जयजयकार आणि बाजारपेठ दणाणून गेली. त्याच वेळी तरुणांचे साहसी खेळाचे प्रात्यक्षिकाचे सादरीकरण झाले. रथामध्ये श्रीराम, लक्ष्मण, सीता व बजरंग बली, विराजमान झाले होते.

पालखी सोहळयाच्या अग्रभागी आमदार महेंद्र थोरवे, युवा उद्योजक विक्रम साबळे, शिवसेना शहर प्रमुख संदीप पाटील, मनसेचे संजय तन्ना, मितेश शहा, भाजपचे रमेश रेटरेकर हेमंत नांदे, विश्व हिंदू परिषदेचे रुपेश मिस्त्री, रास्व संघाचे अविनाश मोरे, राकेश पाठक, जनकल्याण समितीचे नितीन भावे, राहुल गायकवाड, सोनू शेलार, ब्राह्मण सभेचे अनिल रानडे, राष्ट्रसेविका समितीच्या माधवी कुवळेकर, भाजप महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# तळाघर येथील महादेवाच्या यात्रेला अलोट गर्दी

## देवाचा लग्नसोहळा थाटामाटात

**धाटाव : प्रतिनिधी**

चैत्र महिन्यात भरविण्यात आलेल्या रोहा तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या तळाघर येथील स्वयंभू महादेवाच्या यात्रेला तसेच श्री शंभू महादेव आणी पार्वती मातेचा विवाह सोहळा पाहण्यासाठी अलोट गर्दी झाली.

दरवर्षी रामनवमीच्या आदल्या दिवशी रात्रौ १२ वाजता श्री महादेवाचे लग्न लागते. हे लग्न पाहण्यासाठी लाखो भाविक सहभागी होतात. स्वयंभू महादेव मंदिर येथे देवाचा लग्न पारंपरिक पद्धतीने झाला. तालुक्यातील खारगाव येथील नवरदेव तर धाटावची नवरी असते.लग्नसोहळा पाहण्यासाठी अठरा पगड जातीचे बारा बलुतेदार या देवाच्या यात्रेकरीता दरवर्षी मोठ्या उत्साहाने येत असतात. दोन दिवस ही यात्रा सुरू असते. यात्रेचा मानसन्मान हा पुरातन आहे. पेशवे व सिद्दी यांच्यात झालेल्या करारात या यात्रेच्या लग्न सोहळ्याचा उल्लेख असल्याचे सांगण्यात येते.



धाटाव पंचक्रोशीतील तळाघर, लांढर, बोरघर, वाशी, महादेववाडी, धाटाव यात्रा पंच कमिटी असते. या वेळी लग्नसोहळ्यास लागणारी मातीची भांडी दमखाडीचे कुंभार देतात. तळाघरेचे मोरे दिपमाळ लावतात. खारगाव येथून पालखी येते. मानाचे निमंत्रण देण्याचामान बामुगडे घराण्याकडे आहे. सोनगावचे ग्रामस्थ तेलवण, वरातीचे निमंत्रण देतात. धाटाव गावातून काठी तेलवणाच्या दिवशी येते. शिवपार्वतीची प्रतिष्ठापना उत्तर काठीवर होते. वारळची काठी मंदिरासमोर उखळात उभी करतात. किल्ला व तळाघर गावातील करवला करवली उभे असतात. मंगलाष्टक बोलण्यासाठी धाटाव, लांढर, भुवनेश्वर, वाशी, महादेव वाडी, देवकान्हे येथील जंगम उपस्थित होते.

ऐतिहासिक आणि आगला वेगळा लग्न सोहळ्याच्या वेळी सुतार व भगत महादेवाची मूर्ती मांडीवर घेऊन विवाह सोहळ्यास बसतात. नवरीकडील धाटाव व नवरदेवाकडील खारगावची मंडळी व वरसगावची मंडळी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच बहुसंख्येने कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ठिकाणी निघणाऱ्या मानाच्या काठ्यची पूजा कार्यसम्राट आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आली.

या वेळी विनोद पशिलकर, संदीप तटकरे, भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, समीर शेडगे, अनिल भगत, सुरेश मगर, शंकरराव भगत, ज्ञानेश्वर साळुंके, हरिश्चंद्र मोरे, संतोष माने, हरिश्चंद्र माने, गुणाजी पोटफोडे, लीलाधर मोरे, विठ्ठल मोरे, दगडु बामुगडे, लक्ष्मण स्वामी जंगम यांसह परिसरातील नागरिक, बहुजन समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लग्न सोहळ्यास रोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मुपडे उपस्थित होते. यात्रेत काठी नाचवण्याची परंपरा आहे, तालुक्यासह जिल्ह्याच्या अन्य तालुक्यातून भव्य दिव्य आशा सजवून काठया येतात, लग्न सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी मोठी यात्रा भरते. यात्रेस मोठ्या प्रमाणात गर्दी असते, लग्न सोहळ्यास यात्रेस नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, तसेच राम नवमीला दुपारी तिर्थासाठी यात्रेकरूंची तसेच भक्तगणांनी उसळलेली अलोट गर्दी पहावयास मिळाली. खालुबाजा, सनई तसेच ढोल ताशांच्या निनादात सुरू असलेल्या काठ्यांच्या भव्य मिरवणुकीने उपस्थित भाविकांबरोबर लहानग्यांचा आनंद काही औरच असल्याचे दिसले.

# परताव्याच्या आमिषाने कोट्यवधींचा गंडा

## सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

समाज माध्यमातून संपर्क करीत गुंतणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे प्रकार घडत आहेत, मात्र तरीही अशा ठिकाणी गुंतवणूक केली जात आहे. अशाच ठिकाणी गुंतवणूक करून नवी मुंबईतील एका व्यक्तीची ४५ लाख ६९ हजार ५०० रुपयांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

खारघर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीने इंस्टाग्राम सहज म्हणून पाहत असताना त्यांना स्टोक लॉस रिकव्हरी नावाची लिंक दिसली. त्यावर क्लिक करताच त्यांचा समावेश बॉण्ड सिक्योरिटी नावाचा त्यांच्या व्हाट्स अप समूहात झाला. त्याचे प्रशासक शरीफ सिंग म्हणून होते. ते रोज दुपारी १२ वाजता सट्टा बाजारात कसे व्यवहार करावे याची शिकवणी देत होते. तसेच समूहात सर्व सदस्य किती गुंतवणूक केली किती परतावा मिळाला. कमी अवधीत लाखो रुपये मिळवले अशाच पद्धतीच्या चर्चा करत होते. याला भुलून फिर्यादी यांनीही गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली. यावर किती गुंतवणूक



केली आणि किती परतावा मिळाला हे पाहण्यासाठी एक ॲप फिर्यादींना डाऊनलोड करण्यास लावले. आठ मार्च ते १४ मार्च दरम्यान तीन वेळा दहा आणि एक वेळा वीस हजार त्यांनी भरले.

काही दिवसात त्याचा परतावा एक लाख २० हजार आलाही. त्यामुळे यावर फिर्यादी यांचा विश्वास बसला. त्यानंतर १० हजार ते पाच लाख अशा विविध रकमा त्यांनी ऑनलाईन फिर्यादीने दिलेल्या विविध खात्यात भरल्या. त्याचा परतावा मागितला असता विविध कर रूपात पुन्हा पैशांची मागणी करण्यात आली. अशा पद्धतीने ८ मार्च ते १४ एप्रिल दरम्यान तब्बल ४५ लाख ६९ हजार ५०० फिर्यादी यांनी दिले त्याचा परतावा म्हणून ९८ लाख सहा हजार ५५४ रुपये ॲप वर दिसत होता, मात्र प्रत्यक्ष बँक खात्यात दमडी जमा होत नव्हती आणि पैशांची मागणी संपत नव्हती. त्यामुळे आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने सायबर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# खारघरमधील तरुणीवर अत्याचार

## तरुणावर गुन्हा दाखल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर वसाहतीमध्ये राहणाऱ्या २५ वर्षांच्या एका तरुणीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब वाशीमध्ये घडली आहे. याबाबत पीडित तरुणीने खारघर पोलिसांना दिलेल्या तक्रारीमध्ये मागील दोन वर्षांत वाशीमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने हा अत्याचार केल्याचे सांगितल्यावर पोलिसांनी याबाबत बलात्कार व फसवणुकीचा गुन्हा या व्यक्तीविरोधात नोंदविला आहे.

अत्याचार करणाऱ्या व्यक्तीने मोठ्या पदावर काम करत असल्याचे भासवून या पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून प्रेमात अडकवले. पीडितेचा विश्वास संपादन केल्यावर नवी मुंबईतील सानपाडा येथील हॉटेल स्काय स्वीटमध्ये वारंवार तिच्यावर अत्याचार केल्याचे पीडितेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे अत्याचार करताना त्याने पीडितेचे चित्रण केले. पीडितेने इतर कोणाशी लग्न केल्यास संबंधित चित्रण समाजमाध्यमांवर प्रसारीत करणे, जो कोणी पीडितेशी लग्न करेल त्यालासुद्धा पाठविणे अशी धमकी अत्याचार करणाऱ्याने दिली. त्यामुळे पीडितेचे लग्न मोडले. अखेर बुधवारी खारघर पोलिसांत पीडितेने संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविला.



**पनवेल : रामनवमीनिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहरासह, कामोठे, कळंबोली, खारघर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या उत्सवास सदिच्छा भेट देऊन प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. कामोठे येथे भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, युवा नेते हॅप्पी सिंग; खारघर येथे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष किरण पाटील; तर कळंबोली येथे सरचिटणीस दिलीप बिस्ट यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.**

# कोपरखैरणेतील अतिक्रमणावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभागांतर्गत भालचंद्र आत्माराम दळवी, घर क्र. ८११(४), बोनकोडे गाव, समतानगर, सेक्टर-१२, कोपरखैरेणे, नवी मुंबई. सदानंद शांताराम म्हात्रे, घर क्रमांक - ६१३, सेक्टर- १९, कोपरखैरणे गाव, कोपरखैरणे, नवी मुंबई यांनी महापालिकेची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतरित्या बांधकाम केले होते. त्यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४



अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. त्याअनुषंगाने बांधकामावर निस्कासनाची कारवाई करण्यात आली.

कारवाई आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आदेशान्वये, उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांचे मार्गदर्शनाखाली, सहाय्यक आयुक्त सुनील काठोळे, कनिष्ठ अभियंता सचिन नामवड यांचेसह कोपरखैरणे विभागाकडील अधिकारी अथवा कर्मचारी, नमुंमपा पोलीस बंदोबस्त तसेच, २० मजूर, एक पिकअप व्हॅन, सहा इलेक्ट्रॉनिक हॅमर, तीन गॅस कटर, एक जेसीबी इत्यादींचा वापर करून करण्यात आला. यापुढेदेखील अशाप्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# मतदान जनजागृतीसाठी सिडकोचे आवाहन

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता नवी मुंबई क्षेत्रातून मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकारी आणि कार्यकारी समितींनी जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

भारतीय निवडणूक आयोगामार्फत लोकसभा सार्वत्रिक निवडणुका घोषित करण्यात आल्या असून देशभरात एकूण ७ टप्प्यांमध्ये निवडणूक पार पडणार आहे. नवी मुंबई क्षेत्रातील मावळ आणि ठाणे लोकसभा मतदारसंघांकरिता अनुक्रमे ७ मे आणि २० मे रोजी मतदान होणार आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था म्हणून भारताचा लौकिक आहे. लोकशाही प्रक्रिया बळकट करण्याकरिता मतदारांनी आपले मतदानाचे कर्तव्य बजावणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सिडकोतर्फे गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकारी समिती सदस्यांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या गृहनिर्माण संस्थांतील रहिवाशांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याकरिता संस्थेच्या आवारात भित्तीपत्रके (पोस्टर), निवडणुकीविषयक सूचना प्रसिद्ध कराव्यात. तसेच अन्य माध्यमांद्वारेही जनजागृती करून संस्थेतील रहिवाशांना मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रोत्साहित करावे.

# तुर्भे एपीएमसी मार्केटमध्ये प्लास्टिक जप्त



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेप्रमाणेच एकल वापर प्रतिबंधावरही विशेष लक्ष दिले जात असून नागरिकांच्या प्रबोधनासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवायांवर लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने मंगळवारी (दि.१६) तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रात एपीएमसी मार्केट येथे जयेश कुमार अँड कंपनी या ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त कारवाईत २.५ टन इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला.

या कारवाईप्रसंगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी जयंत कदम, क्षेत्र अधिकारी अजित देशमुख व शशिकांत पाटील यांच्यासमवेत नवी मुंबई महानगरपालिकेचे तुर्भे विभाग सहाय्यक आयुक्त भरत धांडे, स्वच्छता अधिकारी जयेश पाटील, स्वच्छता निरीक्षक जयश्री आढळ, सुषमा देवधर, योगेश पाटील उपस्थित होते.

या कारवाईत जयेश कुमार अँड कंपनीकडून साधारणत: २.५ टनाहून अधिक प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच संबंधितांकडून पाच हजार व सरस फुड्स मार्ट, एपीएमसी मार्केटकडून पाच हजार अशी एकूण १० हजार दंडवसुली करण्यात आली. त्याचप्रमाणे हा जप्त केलेला प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी क्रशिंगसाठी पाठवण्यात आलेला आहे.

# मोहोपाडा परिसरात श्रीराम नामाचा जयजयकार करीत भव्य शोभायात्रा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व सकल हिंदू समाज आयोजित बजरंगी मित्र मंडळ रसायनीच्या वतीने मोहोपाडा परिसरात श्रीराम नामाचा जयजयकार करीत भव्य शोभायात्रा काढून श्रीरामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने शिवनगर येथील श्री गणेश मंदिरात श्री गणेशाची आरती करून रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांच्याहस्ते श्रीरामाचे पुजन करुन पालखीचा मान देवून शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. शोभायात्रेतील रथात श्रीराम, लक्ष्मण, सीता व श्री हनुमानाचा वेशभुषेत चित्र साकारले होते.या रथाला सजावट करुन श्रीरामाची प्रतिमेला सजावट करण्यात आली होती.शोभायात्रा शिवनगर श्री हनुमान मंदिर, चांभार्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करत दांड-रसायनी रस्त्यावरुन मोहोपाडा अशी



काढण्यात आली.

या वेळी मोहोपाडा प्रवेशव्दाराजवळ शोभायात्रा येताच फटाक्यांची आतषबाजी करुन जल्लोषात स्वागत करण्यात आले. मोहोपाडा बाजारपेठेतील रस्त्यावर रांगोळी काढण्यात आली होती. या शोभायात्रेतील ढोल ताशा पथक, डिजे, चलचित्र आकर्षण ठरत होते. मोहोपाडा नवीन पोसरी बाजारपेठेत श्रीरामाचे ध्वज उभारल्याने सर्वत्र भगवेमय वातावरण निर्माण पहावयास मिळाले. शोभायात्रा मोहोपाडा शिवाजी चौकात येताच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस हभप वामन महाराज भोईर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या वेळी हिंदू धर्म जनजागृती व्याख्यान झाले.

यानंतर शोभायात्रा श्री दत्त मंदिर,श्री गणेश मंदिर येथून श्रीराम मंदिर मोहोपाडा येथे पोहचल्यावर आरती होवून शोभायात्रेची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बजरंगी मित्र मंडळाने परिश्रम घेतले.

# बेलापूर येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील बेलापूर गावात श्रीराम जन्मोत्सव सोहळा झाला. दरवर्षीप्रमाणे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.



श्रीराम जन्म सोहळयास आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत, माजी महापौर जयवंत सुतार, राम मंदिराचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजी नगरसेवक अमित पाटील, सुनील पाटील, दिपक पवार, ज्ञानेश्वर सुतार, दि.ना.पाटील, समाजसेवक कुंदन म्हात्रे, रोहिदास पाटील, बाळकृष्ण बंदरे, नारायण मुकादम, प्रमोद जोशी, निळकंठ म्हात्रे, कुणाल म्हात्रे, अंकित म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, विज्ञान म्हात्रे, भालचंद्र म्हात्रे, पत्रकार मनोज जालनावाला, प्रियांका म्हात्रे, मनोज म्हात्रे तसेच बेलापूर गावातील ग्रामस्थ यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, रासपा महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी प्रभाग क्रमांक १७मध्ये गुरुवारी प्रचार करण्यात आला. छत्रपती शिवाजी नगर वसाहत, नवनाथ नगर वसाहत, भगत चाळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चाळ येथे करण्यात आलेल्या प्रचारावेळी माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, भाजप अनुसूचित जाती मोर्चा शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, झोपडपट्टी सेल जिल्हा संयोजक राहुल वाहुळकर आदी उपस्थित होते.**

# आरटीई प्रवेशाची ऑनलाईन प्रक्रिया सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९मधील कलम १२ (१) नुसार सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षाकरिता अल्पसंख्यांक शाळा वगळून मान्यताप्राप्त खाजगी, महानगरपालिका, अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये दुर्बल, वंचित, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली किंवा पूर्वप्राथमिक वर्गात २५ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे.

शासनामार्फत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील १६ एप्रिल २०२४ पासून पालकांना ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी सुरू करण्यात आले आहेत. हे अर्ज ३० एप्रिल २०२४ पर्यंतच भरता येणार आहेत. प्रवेश अर्ज भरण्यासाठी वेबसाईट देण्यात आलेली आहे. प्रवेश अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना आरटीई २५ टक्के प्रवेश पोर्टलवर दिलेल्या आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत पालकांना आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी nmmcrte25gmail.com हा ईमेल आयडी तयार करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी तसेच याबाबतच्या अधिक माहितीसाठी खालीलप्रमाणे गटनिहाय केंद्र समन्वयक यांचेशी संपर्क साधण्यात यावा, असे शिक्षणाधिकारी अरूणा यादव यांनी सूचित केले आहे.

# मतपेट्यांच्या संरक्षणासाठी स्ट्राँगरुम

## पोलीस प्रशासन २४ तास ऑनड्युटी




**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होत असून यासाठी आवश्यक मतपेठ्या रवाना झाल्या आहेत. सात विधानसभा क्षेत्रांमध्ये मतपेट्यांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी संपूर्ण मतदारसंघात खास स्ट्राँगरुम तयार करण्यात आले असून २४ तास पोलीस संरक्षणात या मतपेट्या ठेवण्यात आल्या आहेत.

या मतपेट्या संबंधित विधानसभा मतदारसंघात १५ दिवसांपूर्वीच पाठविण्यात आल्या. या मतपेट्या सर्व तांत्रिक चाचण्या पार करूनच पाठविण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे यांनी दिली आहे.

पेण विधानसभा मतदारसंघातील इलेक्ट्रॉनिक मतदान आणि व्हीव्हीपॅट यंत्र ठेवण्यासाठी कोकण एज्युकेशन सोसायटीच्या लिटील एन्जल स्कूलमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघातील मतपेट्या जेएसएम महाविद्यालयातील जिमखान्यात ठेवण्यात आल्या आहेत. श्रीवर्धनमधील न्यू इंग्लिश स्कूल व म्हसळामधील ज्युनिअर कॅलेज येथे स्ट्राँगरुम तयार करण्यात आली आहेत. महाड विधानसभा हद्दीतील मतपेट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात ठेवण्यात आल्या आहेत. दापोली मतदारसंघासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठातील सभागृहात व्यवस्था करण्यात आली आहे.

गुहागर मतदारसंघातील मतपेट्या खेड येथील घरडा टेक्नॉलॉजी इमारतीमध्ये ठेवण्यात आल्या आहेत. मतपेट्यांच्या सुरक्षेसाठी दिवसरात्र पोलिसांचा सशस्त्र पहारा देण्यात येत आहे. याची संपूर्ण जबाबदारी सबंधित प्रांताधिकाऱ्यांकडे देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागातून देण्यात आली.

## निवडक

### डॉ. अश्विनी जोशी यांना पुरस्कार



**धाटाव** : रोह्याच्या वरद क्लिनिकच्या डॉ. अश्विनी जोशी यांनी मेंबर ऑफ रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन, युनाइटेड किंग्डम येथील परीक्षेत विशेष प्राविण्यासह उज्ज्वल यश प्राप्त केले. यामुळे डॉ. अश्विनी जोशी यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वैद्यकीय सेवा देताना डॉ. जोशी यांना २०१५ साली डॉ. आनंदीबाई जोशी सन्मान पुरस्कार मिळाला आहे. यासोबतच कोरोना महामारी काळात त्यांना वैशिष्ट्यपूर्ण योगदानाबद्दल वर्ल्ड बुक ऑफ लंडन यांनीदेखील सन्मानित केले आहे.

### पेणच्या श्रीराम मंदिरात जन्मोत्सव



**पेण** : तालुक्यातील सापोली या गावातील श्रीराम मंदिरात श्रीरामजन्मोत्सव झाला. यानिमित्ताने हभप श्रीनिवास काजरेकर यांचे रामजन्माचे कीर्तन झाले. त्याना मुकुंद जोशी यांनी संवादिनी तर नितीन महाजन यांनी तबलासाथ केली. रामजन्माच्या वेळी भाविकांनी पुष्पवृष्टी केली. लहान मुलींनी पाळणा गायला. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे परमशिष्य श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेतून त्यांचे शिष्य विवेक आघारकर यांनी हे मंदिर बांधले आहे. या ठिकाणी रामनवमीनिमित्त भागवत सप्ताह आणि दासबोध वाचन झाले. भाविकांकडून श्रीराम मंत्राचा १३ कोटी जप करण्याचा संकल्प करण्यात आला आहे, तसेच श्रीराम महाराजांचे शिष्य अच्युत पाठक, लातूर यांच्याकडून अनेक भाविकाना मंत्रदिक्षा देण्यात आली.

### मांडवा येथे कबड्डी स्पर्धेचा थरार

**अलिबाग** : टाकादेवी स्पोर्ट्स क्लब व ग्रामस्थ मांडवा यांचे संयुक्त विद्यामाने, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने रेवस पंचक्रोशी मर्यादित पुरुष कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.२०) मांडवा बंदर येथे करण्यात आले आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांक रू. १० हजार, द्वितीय सात हजार, तृतीय पाच हजार व चतुर्थ पाच हजार रुपये व भव्य चषक अशी आकर्षक बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. सर्वोत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ठ पकड, उत्कृष्ट चढाई व पब्लिक हिरो यांना सायकल व बक्षीस देण्यात येणार आहे, तसेच प्रत्येक सामान्यातील सामनावीरास आकर्षक चषक देण्यात येईल. या सामान्याचे खास आकर्षण म्हणून प्रेक्षकांसाठी लकी ड्रॉ बक्षीस ठेवण्यात आले आहे. स्पर्धा मांडवा टाकादेवी क्रीडा नगरी मांडवा बंदर येथे भरवण्यात येणार आहेत.

## चोऱ्या करणाऱ्या चौकडीला पेण पोलिसांनी केले जेरबंद



**पेण : प्रतिनिधी**

कोप्रोली गावामध्ये राहणाऱ्या महिला नलिनी प्रवीण पाटील (वय ३९, रा. कोप्रोली वरची आळी, ता. पेण) यांच्या घरी सप्टेंबर २०२३मध्ये दोन लाख ८६ हजारांची घरफोडी झाली होती. या गुन्ह्याचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक समद बेग यांच्याकडे दिला. याबाबत फिर्यादी यांच्या घरामध्ये कोणाकोणाचा वावर होता, याबाबत कसोशीने माहिती घेऊन, तसेच गोपनीय सूत्रांकडून माहिती घेऊन व तांत्रिक बाबींचा तपास करून गुन्ह्याची सहा महिन्यांनंतर उकल केली. आरोपी शुभम मधुकर भोईर याला ताब्यात घेतले.

आरोपी शुभम भोईर नलिनी पाटील यांच्या मुलाचा मित्र आहे. शुभम भोईर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी पेण, वडखळ, रेवदंडा व अलिबाग या पोलीस ठाण्यामध्ये पाच गुन्हे दाखल आहेत. शुभमसह त्याचे साथीदार ऋतिक जनार्दन माळी (वय २०), हर्षल प्रशांत म्हात्रे (वय २०), प्रतिक जीवन ठाकूर (वय १९) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ६७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम अशी एकूण तीन लाख सहा हजार १०० रुपये किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपींना कोर्टात हजर केले असता सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. ही कामगिरी पेण निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक समद बेग, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, हेड कॉन्स्टेबल राजेंद्र भोनकर, संतोष जाधव, प्रकाश कोकरे, सचिन वस्कोटी, अजिंक्य म्हात्रे, सुशांत म्हात्रे, अमोल म्हात्रे, गोविंद तलवारे यांनी केली.

## खालापूर तहसील कार्यालयात स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ

**खालापूर : प्रतिनिधी**

जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किशन जावळे, निवडणूक निर्णय अधिकारी दिपक सिंघला यांच्या आदेशाने व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्यात तहसील कार्यालयाचे प्रांगणात स्वीप कार्यक्रमांतर्गत स्वाक्षरी मोहिमेद्वारे मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली.

स्वाक्षरी मोहिमेस सुरुवात तहसीलदार खालापूर आयुब तांबोळी व पोलीस उपविभागीय अधिकारी खालापूर विक्रम कदम यांच्या हस्ते फीत कापून बुधवारी (दि.१७) करण्यात आली.

या वेळी अप्पर तहसीलदार पूनम कदम, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महसूल नायब तहसीलदार विकास पवार, निवडणूक नायब तहसीलदार दशरथ भोईर, मंडळ अधिकारी संदेश पानसरे आदी प्रमुखांसह तहसील कार्यालयातील कर्मचारी, पोलीस विभागातील कर्मचारी तसेच मतदार वर्ग उपस्थित होता.

मोरेवाडी येथे स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती करण्यात आली. या वेळी मंडळ अधिकारी संदेश पानसरे, तलाठी प्रतिक बापर्डेकर, तलाठी किरण लोखंडे, कोतवाल आरती निधी उपस्थित होते.



## भाजप युवा मोर्चा रोहा तालुका सरचिटणीसपदी मोरेश्वर म्हात्रे

**नागोठणे : बातमीदार**

श्री रामनवमीचे औचित्य साधून बुधवारी (दि.१७) पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, रायगड लोकसभा प्रमुख सतीश धारप, भाजप जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, पेण विधानसभा निवडणूक प्रमुख प्रसाद भोईर, श्रीवर्धन विधानसभा प्रमुख प्रशांत शिंदे, अलिबाग विधानसभा प्रमुख दिलीप भोईर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, रोहा मंडळ अध्यक्ष अमित घाग यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप नेते किशोर म्हात्रे यांचे पुतणे मोरेश्वर म्हात्रे यांची युवा मोर्चा रोहा तालुका सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



युवा मोर्चा रोहा तालुकाध्यक्ष महेश ठाकूर यांनी तसे पत्र दिले असून या नियुक्तीबद्दल मोरेश्वर म्हात्रे यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मोरेश्वर म्हात्रे हे नेहमीच अडीअडचणीत असणाऱ्यांना मदत करीत असतात. त्यांनी विभागातील अनेक तरुणांना सोबत घेऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मोलाची मदत केली आहे.त्यामुळेच त्यांची रोहा तालुका कमिटीवर निवड झाली आहे.

## पेण तालुक्यात रामजन्मोत्सव भक्तिभावाने साजरा

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील अनके गावांमध्ये रामजन्मोत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. ठिकठिकाणी प्रवचन, हरिपाठ, भजन, कीर्तन, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



प्रतिअयोध्या मानल्या जाणाऱ्या बळवली गावात हा उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या वेळी मोठी यात्रा येथे भरली होती. यात्रेत मेवा, मिठाई खेळण्यांची दुकाने, पाळणे व इतर दुकानांमुळे यात्रेला शोभा आली होती. या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी बळवली, हनुमानपाडा येथे उत्सवात भेट देऊन दर्शन घेतले.

रावे गावातही रामनवमी उत्सव साजरा करण्यात आला. आमदार रविशेठ पाटील, माजी जि. प. सदस्य कौसल्या पाटील, माजी जि. प. विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील, पेण न. प. माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, ललित पाटील, ॲड. प्रशांत पाटील, शर्मिला पाटील, सुषमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, प्रतिभा पाटील व पाटील परिवारातील सदस्यांनी दर्शन घेतले. बोर्वे येथील रामजन्मोत्सव सोहळ्यात प्रभाकर म्हात्रे, भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, यशवंत म्हात्रे, प्रभाकर शेठ, माजी सरपंच बळीराम भोईर यांनी उपस्थिती लावून दर्शन घेतले. दिसू येथे नागेश्वर भाऊबंद मित्रमंडळतर्फे ९ ते १८ एप्रिलदरम्यान श्रीराम जन्मोत्सव निमित्त विविध कार्मिक कार्यक्रम झाले.

२१ एप्रिल रोजी नागेश्वर देवस्थान दिव येथे यात्रेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांच्या वतीने करण्यात आले असून या यात्रेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शहरातील रामेश्वर मंदिर, साई मंदिर, कोतवाल चौक येथेही रामनवमीनिमित्त विविध कार्यक्रम झाले.

## सुधागडात स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज; सर्वत्र कडेकोट बंदोबस्त

**सुधागड : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज करण्यात आले आहेत. तालुक्यातील २१ गणपती व गोंदाव फाटा या ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज आहेत. तालुक्यात सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

सध्या राज्यात लोकसभेची रणधुमाळी सुरू असताना निवडणुकीत कुठलाही गैरप्रकार होऊ नये, या अनुषंगाने सहाय्यक निवडणूक अधिकारी पेण मतदारसंघ यांच्या अधिपत्याखाली सुधागड तालुक्यात बाहेरून प्रवेश करणाऱ्या सीमेवर अवैध दारू, अवैधरित्या पैसे, त्याचप्रमाणे



अवैध शस्त्रसाठा येण्याची निवडणुकीमध्ये दाट शक्यता आहे. यामुळे निवडणुकीच्या वेळेला गोंधळ होण्याची तसेच वाईट कृत्य होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

मतदान सुरळीत पार पडावे यासाठी सुधागड तालुक्यात प्रवेश करणाऱ्या सर्व सीमेवर प्रतिबंधात्मक खबरदारी म्हणून चेक पोस्टवरून प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांची कसून चौकशी करून वाहने सोडण्यात येत आहेत.

## म्हसळ्यात रामनवमी उत्साहात साजरी

### ठिकठिकाणी कीर्तन, दिंडी, मिरवणुकीने धार्मिक सोहळा

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरात राममंदिरात श्रीरामाच्या जन्मोत्सवानिमित्त रोहा येथील कीर्तनकार सुषमा भावे यांनी रामजन्माची कथा, अभंग यातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. या वेळी त्यांना हार्मोनियमवर वेदश्री मंदार भावे, तबल्यावर सुधीर करडे यांनी अतिशय अप्रतिम साथ दिली.

श्रीमती भावे यांनी, समर्थ रामदास स्वामींच्या जीवनपट व मानवहितासाठी त्यांचे योगदान आणि उत्तरार्धात श्री रामायण, अयोध्या, श्री रामजन्मभूमी अशा सर्वच लेखाजोगा सादर केला. शहरातील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयांत भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन प्रभाकर कर्णिक आणि



रामदरबाराचे पूजन म्हसळा तालुका भाजपाचे माजी अध्यक्ष प्रकाश रायकर यांचे हस्ते करण्यात आले.

या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, अशोक पाटील, सुबोध पाटील, लक्ष्मण पाटील, सुजय कुसळकर, रुपेश कांबळे, ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले, प्राची मेंदडकर आदी उपस्थित होते. पुस्तक प्रदर्शनातील विवेक, वाल्मिकी रामायण, दासबोध, वारी, रामायण, श्रीदत्तमहात्म्य, श्रीकृष्णलीलामृत, श्रीमद् भगवदगीता आदी पुस्तके ठेवण्यात आली. तालुक्यातील देवघर येथील साईबाबा मंदिरांत काकड आरती रामजन्मोत्सव, पाळणा आरती झाली.

देवघरमध्ये सुरेंद्र शिर्के, अमित महामुनकर, अनिल महामुनकर, प्रा. शिरीष समेळ, वनिता समेळ, अमोल शिगवण या मंडळीनी भारदस्त नियोजन केले होते. पाभरे, रेवली, खरसई या गावांतून मिरवणुका कार्यक्रम झाला.

## तटकरे तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची रिलायन्स कंपनीमध्ये निवड

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोलाड गोवे येथील श्रीमती गीता द.तटकरे तंत्रनिकेतन महाविद्यालयामधील केमिकल शाखेतील तीन विद्यार्थ्यांची रिलायन्स कंपनीमध्ये निवड करण्यात आली आहे.

रिलायन्स कंपनीमार्फत नोकरी मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात केमिकल शाखेतील सुयोग सानप, सोहम मोकल, हार्दिक पाटील यांना प्रशिक्षण देऊन निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांची निवड होताच विश्वस्त संदीप तटकरे, रजिस्टार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल व विभाग प्रमुख बिनीता चौधरी तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



**मुरूड : रामनवमीनिमित्त एकदरा गावामध्ये सायंकाळी रथायात्रा काढण्यात आली. या वेळी तरुणांनी रामायणातील विविध रूपे साकारली.** (छाया : सुधीर नाझरे)

# दिल्लीची गुजरातवर एकतर्फी मात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये बुधवारी झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने गुजरात टायटन्स संघावर सहा विकेट्सनी एकहाती विजय मिळवला. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीस आलेला गुजरातचा संघ १७.३ षटकांत ८९ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्सने ८.५ षटकांत ४ बाद ९२ धावा करीत विजयावर शिक्कामोर्तब केले. त्याचबरोबर दिल्लीने चेंडूच्या बाबतीत आयपीएलमधील सर्वांत मोठा विजय नोंदवला.



लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात चांगली झाली. पृथ्वी शॉ आणि जॅक फ्रेझर-मॅकगर्क यांच्यात पहिल्या विकेटसाठी २५ धावांची भागीदारी झाली. स्पेन्सर जॉन्सनने संघाला पहिला धक्का देत मॅकगर्कला बाद केले. त्याला दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २० धावा करता आल्या, तर शॉ केवळ सात धावा करू शकला. या सामन्यात अभिषेक पोरेलने १५, शाई होपने १९, ऋषभ पंतने १६ आणि सुमित कुमारने नऊ धावा केल्या. पंत आणि सुमित नाबाद राहिले. गुजरातकडून संदीप वारियरने दोन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर स्पेन्सर जॉन्सन आणि राशिद खान यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेला गुजरातचा संघ दिल्लीच्या गोलंदाजांपुढे १७.३ षटकांत ८९ धावांवर गारद झाला. गुजरातच्या डावात आठ फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. साई सुदर्शनने १२ आणि राहुल तेवतियाने १० धावांचे योगदान दिले. १५व्या षटकापर्यंत गुजरातची धावसंख्या आठ गड्यांच्या मोबदल्यात ७८ धावा होती, पण राशिद खान भक्कम भिंतीसारखा क्रीजवर उभा राहिला. तोही धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. गुजरातच्या डावात षटकार ठोकणारा राशिद खान हा एकमेव फलंदाज होता. संथ खेळपट्टीवर झुंजत असताना गुजरातचा डाव १८व्या षटकातच संपुष्टात आला, जेव्हा नूर अहमदला मुकेश कुमारने क्लीन बोल्ड केले.

### दिल्लीच्या गोलंदाजीसमोर गुजरातचे फलंदाज निष्प्रभ

यंदाच्या आयपीएलमध्ये आतापर्यंत दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजांची खूप धुलाई झाली होती, परंतु गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात प्रत्येकाने शानदार कामगिरी केली. मुकेश कुमारने तीन, इशांत शर्मा आणि ट्रिस्टन स्टब्सने तीन, तर खलील अहमद आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. कुलदीप यादवला एकही विकेट घेता आली नसली, तरी त्याने चार षटकांत केवळ १६ धावा देऊन गुजरातच्या फलंदाजांना सतत दबावाखाली ठेवले. दिल्लीच्या तगड्या गोलंदाजीमुळे गुजरात संघ पूर्ण २० षटकेही खेळू शकला नाही.

# चेन्नई सुपर किंग्जला मोठा धक्का

## डेव्हॉन कॉनवे दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर



**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलचा जवळपास निम्मा हंगाम संपला आहे. संघ एकमेकांना मागे टाकण्यासाठी स्पर्धा करीत आहेत, जेणेकरून ते प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित करू शकतील. दरम्यान, ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्जला मोठा धक्का बसला आहे. डेव्हॉन कॉनवे आयपीएलच्या संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे. त्याच्या बदलीची घोषणाही संघाने केली आहे. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज रिचर्ड ग्लीसनचा संघात समावेश करण्यात आला आहे.

आयपीएलच्या १७व्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी डेव्हॉन कॉनवेला दुखापत झाली होती, ज्यामुळे तो हंगामाच्या सुरुवातीपासूनच संघाच्या बाहेर होता. गेल्या दोन वर्षांपासून सीएसकेकडून खेळत असलेल्या कॉनवेबद्दलच्या बातम्या आधीच आल्या होत्या की तो किमान अर्ध्या हंगामानला मुकू शकतो. त्यामुळे तो नंतर परतेल अशी अपेक्षा होती, पण आता बातमी आली आहे की तो संपूर्ण हंगामासाठी बाहेर पडला आहे. गेल्या आयपीएलमध्ये कॉनवेने सीएसकेसाठी सर्वाधिक धावा केल्या होत्या.

कॉनवेच्या अनुपस्थितीत सीएसकेने रिचर्ड ग्लीसनचा संघात समावेश केल्याचे जाहीर केले आहे. तो वेगवान गोलंदाजी करतो आणि त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इंग्लंडकडून सहा सामने खेळत नऊ विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, कॉनवेच्या अनुपस्थितीत न्यूझीलंडचा रचिन रवींद्र कर्णधार ऋतुराजसह डावाची सुरुवात करीत असून तो आतापर्यंत चांगली कामगिरी करीत आहे.

# लाजिरवाण्या पराभवानंतर शुबमन गिल संतापला



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरातच्या अहमदाबाद येथील स्टेडियमवर बुधवारी एक अनपेक्षित सामना पहायला मिळाला. गुजरात टायटन्सची गाडी घरच्या मैदानावरच रुळावरून घसरली आणि त्यांचा डाव अवघ्या ८९ धावांत आटोपला. हे आव्हान दिल्लीने चार गड्यांच्या मोबदल्यात अवघ्या नऊ षटकांत गाठून दमदार विजय मिळवला. लाजिरवाण्या पराभवानंतर कर्णधार शुबमन गिलने संताप व्यक्त केली आहे.

‘गुजरात टायटन्सच्या लाजिरवाण्या पराभवासाठी खेळपट्टी जबाबदार नाही. खेळपट्टी चांगली होती. हा सगळा दोष फलंदाजांचा आहे. गुजरातच्या फलंदाजांनी खराब फलंदाजी केली. आमचे शॉट सिलेक्शन खराब होते, त्याचे परिणाम संघाला भोगावे लागले. फलंदाजी पूर्णपणे मध्यम दर्जाची झाली. माझ्यासह काही फलंदाजांकडून मला खूप अपेक्षा होत्या, पण त्या अपेक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत. जबाबदारीने खेळणे अपेक्षित होते, मात्र ते घडल्याचे दिसले नाही,’ असे शुबमन गिल म्हणाला.

### पॅरिस ऑलिम्पिक

# अमेरिका, चीनच्या वर्चस्वाची शक्यता

**पॅरिस : वृत्तसंस्था**

पुढील १०० दिवसांत सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक आणि एकूण पदक संख्येच्या बाबतीत अमेरिका, चीन हे दोन देश पहिल्या दोन क्रमांकांवर राहण्याची शक्यता आहे. जगभरातील क्रीडा लीगसाठी सांख्यिकीय विश्लेषण करणाऱ्या निल्सनच्या ग्रेसनोट स्पोर्ट्सने हा अंदाज वर्तविला आहे.

अमेरिका ३९ सुवर्णपदकांसह एकूण १२३ पदके जिंकण्याचा अंदाज आहे. चीन ३५ सुवर्णपदकांसह ८९ पदके जिंकण्याची शक्यता आहे. तीन वर्षांपूर्वी कोरोना महामारीमुळे विलंब झालेल्या टोकियो ऑलिम्पिकमध्येही हे दोन देश पहिल्या दोन क्रमांकांवर होते.

# इम्पॅक्ट खेळाडू नियमामुळे अष्टपैलूंवर अन्याय

### रोहित शर्माचे सडेतोड मत



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्स संघाचा खेळाडू आणि भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माने आयपीएलमधील इम्पॅक्ट खेळाडू नियमाचा भारतीय क्रिकेटला फायदा नसल्याचे म्हटले आहे. एका पोडकास्टमध्ये बोलताना रोहितने आपले सडेतोड मत व्यक्त केले.

रोहित म्हणाला, मला इम्पॅक्ट खेळाडूचा नियम फारसा भावलेला नाही. यामुळे अष्टपैलू खेळाडूंचे महत्त्व कमी झाले आहे. क्रिकेट हा ११ खेळाडूंचा खेळ आहे. सामने आकर्षक करण्यासाठी खेळात बदल केले जात आहेत, पण हा नवीन नियम वॉशिंग्टन सुंदर आणि शिवम दुबेसारख्या अष्टपैलू खेळाडूंसाठी चांगला नाही. सुंदरला सनरायझर्स हैदराबादकडून कमी सामने खेळायला मिळतात, तर चेन्नई सुपर किंग्जकडून भरपूर धावा करणाऱ्या शिवम दुबेने आतापर्यंत या स्पर्धेत गोलंदाजीच केलेली नाही. आपण जर क्रिकेटच्या दृष्टिकोनातून पाहिले तर मला वाटते की शिवम आणि वॉशिंग्टनसारखे खेळाडू गोलंदाजी करताना दिसत नाहीत ही आमच्यासाठी (भारतीय संघासाठी) चांगली गोष्ट नाही.

पुढे बोलताना रोहित म्हणाला, यातून काय साध्य होणार आहे माहित नाही. १२ खेळाडू सामन्यात खेळत आहेत हे तुमच्यासाठी मनोरंजक असू शकते. सामन्याची स्थिती पाहता आणि खेळपट्टीचा विचार करून तुम्ही इम्पॅक्ट खेळाडू निवडता. जर तुम्ही चांगली फलंदाजी केली आणि विकेट गमावल्या नाहीत, तर तुम्ही एक गोलंदाज निवडता जो तुम्हाला सहाव्या किंवा सातव्या गोलंदाजाचा पर्याय देईल. तुम्हाला अतिरिक्त फलंदाजाची गरजच नाही, कारण अनेक संघ चांगली फलंदाजी करीत आहेत आणि सामन्यात सात किंवा आठव्या क्रमांकाचा फलंदाज क्वचितच मैदानावर येत असेल.

# द. आफ्रिकेविरुद्ध श्रीलंकेच्या चमारी अटापट्टूची वादळी खेळी

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

श्रीलंकेच्या महिला संघाची कर्णधार चमारी अटापट्टूने वनडे क्रिकेटमधील वादळी खेळीची नोंद करताना शेन वॉटसन, महेंद्रसिंह धोनी व विराट कोहली या दिग्गजांना मागे टाकले. दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाने विजयासाठी ठेवलेल्या ३०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चमारीने एकटीने नाबाद १९५ धावांची स्फोटक खेळी केली आणि संघाला विजय मिळवून दिला.


आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना पाच बाद ३०१ धावा उभ्या केल्या. कर्णधार लॉरा वोलव्हार्डने १४७ चेंडूंत २३ चौकार व चार षटकारांच्या मदतीने नाबाद १८४ धावा चोपल्या. लारा गुडॉल (३१), मॅरिझने कॅप (३६) व नॅडीन डे क्रेर्क (३५) यांची तिला साथ मिळाली. पण चमारीने १३९ चेंडूंत २६ चौकार व पाच षटकारांसह नाबाद १९५ धावा केल्या आणि श्रीलंकेला सहा विकेट्सने विजय मिळवून दिला. निलाक्षिका सिल्वाने नाबाद ५० धावा केल्या.

वनडे क्रिकेटमध्ये धावांचा यशस्वी पाठलाग करतानाची ही दुसरी सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी ठरली. ग्लेन मॅक्सवेलने २०२३च्या वर्ल्डकपमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध नाबाद २०१ धावा चोपल्या होत्या. चमारीने नाबाद १९५ धावा करून शेन वॉटसन (१८५* वि. बांगलादेश, २०११), महेंद्रसिंह धोनी (१८३* वि. श्रीलंका, २००५) आणि विराट कोहली (१८३ वि. पाकिस्तान, २०१२) यांना मागे टाकले.











**अलिबाग : रायगड लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनी गुरुवारी आपला अर्ज दाखल केला. यानिमित्ताने महायुतीने अलिबागमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन करीत खासदार सुनील तटकरे यांना मोठ्या फरकाने विजयी करण्याचा निर्धार केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी अलिबागजवळील चिंतामणराव केळकर विद्यालयासमोरील मैदानात महायुतीची प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com